०१. त्यांचे जमीनीपैकी ०६ एकर जमीन संस्थानला द्यावयास तयार आहे. उरलेली जमीन त्यांचेसाठी सोडून देण्यात यावी.

०२. सदर जमीन प्रती गुंठा १,२५,०००/- मात्र याप्रमाणे द्यावयास तयार आहे.

सदर अर्जाबाबत तात्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २९-३१ मार्च, २००४ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १५१ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. .. अर्जदार यांचे वरील म्हणण्यावर सविस्तर चर्चा होऊन, हा विषय सामोपचाराने संपृष्टात आणण्यासाठी अर्जदार यांची विनंती मान्य करण्यात यावी, असे ठरले. त्याप्रमाणे मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशनमध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी संयुक्तपणे समझोता अर्ज दाखल करावा, त्याचप्रमाणे सर्व्हे नंबर १४८/१ पैकी वर निर्देश केलेली (संस्थान जमिनी लगतची) ०२ हेक्टर ४० आर (डी.पी. रोडचे क्षेत्र सोडून, ज्याचा वेगळा खरेदी व्यवहार करावा) जमीन संपादन करावयाची कार्यवाही चालू ठेवणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना कळविण्यात यावे आणि जमीन क्षेत्र ०२ हेक्टर ३५ आर ५० चौ.मीटर भूसंपादनातुन वगळण्यात यावे, असेही त्यांना कळविण्यात येऊन, पुर्वीचे प्रस्तावाऐवजी ०२ हेक्टर ४० आर क्षेत्र भूसंपादीत व्हावे आणि त्याप्रमाणे अॅवॉर्ड प्रमाणे होणारी रक्कम उभयतांना मान्य असेल, असे भूसंपादन अधिकाऱ्यांना कळविण्यात यावे."

त्याप्रमाणे श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी-२/४२१३/ २००४, दिनांक ०५ मे, २००४ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच पत्र क्रमांक एसएसएस/ वशी-२/ ५३८६/२००४, दिनांक २९ मे, २००४ व एसएसएस/वशी-२/६४४५/२००४, दिनांक २६ जून, २००४ रोजी स्मरणपत्र दिले.

श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दिनांक २८ जून, २००४ रोजीचे पत्राने, त्या सदरची जमीन ९०,०००/- प्रती गुंठा या दराने द्यावयास तयार आहेत, असे पत्र दिले. त्यांना पत्र क्र.एसएसएस/ वशी-२/ २३६०/२००४, दिनांक २२ जुलै, २००४ अन्वये त्यांची विनंती मान्य करता येत नाही म्हणून कळविण्यात आले.

त्यावर श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी भूसंपादनाच्या अॅवॉर्ड प्रमाणे रक्कम स्विकारण्यास तयार आहोत, असे कळविले. त्यावर साक्षीदार म्हणून त्यांच्या मुली ०१. श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर, ०२. श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे यांनी सहया केलेल्या आहेत.

दिनांक ८ सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये अॅवॉर्डप्रमाणे होणारी रक्कम उभयतांना मान्य असलेचे तसेच रस्त्यात जाणारे क्षेत्र खरेदी करुन द्यावयाचे ठरले, असे कळविलेले आहे.

तद्नंतर श्रीमती साखरबाई शेळके यांनी दिनांक १० सप्टेंबर, २००५ रोजी अर्ज दिला, त्यात त्यांनी खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

१. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी ०२ हेक्टर ४० आर संपादनास लेखी अथवा तोंडी संमती दिलेली नाही.

२. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी रस्त्याचे ११ आर क्षेत्र खरेदी देण्याचे व ताब्यात देण्याचे कधीही मान्य केले नव्हते.

३. सर्व गोष्टी मान्य करुन संमती दिली असा समज करुन घेतल्याचे दिसते.

४. त्यांचे बरोबर कोणताही निश्चीत स्वरुपाचा करार केलेला नाही.

५. संस्थानच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रामधील मजकूर त्यांना मान्य नाही.

थोडक्यात कै. साखरबाई हरीभाऊ शेळके या संस्थानला जमीन देण्यास तयार नव्हत्या.

**(क)** मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी रिट पिटीशन क्रमांक ३९०/२००२ दाखल केलेला आहे. त्यात खालील प्रमाणे मागणी केलेली होती.

०१. मौजे शिर्डी येथील स.नं. १४८/१ क्षेत्र ०५ हे. ०२ आर बाबत मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे चालू असलेले भूसंपादनाचे कागदपत्रे मागवून घेणेत यावेत.

०२. मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी स.नं. १४८/१ क्षेत्र ०४ हे. ५९ आर ५० चौ. मीटर बाबत भूसंपादन कायदा कलम ४ खाली काढलेले क्रमांक भूसंपादन/कावि-६/२/एलक्यु/ एसआर/१०/२००० हे नोटीफिकेशन रद्द करणेत यावे व सदरचे भूसंपादन हे सार्वजनिक कामासाठी नाही व योग्य नाही, असे जाहिर होऊन भूसंपादनाचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

०३. प्रकरणाच्या अनुषंगाने योग्य ते मार्गदर्शन व आदेश होणेस विनंती आहे.

०४. सदर रिट पिटीशनची सुनावणी चालू असतांना व त्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत भूसंपादन कायदा कलम ६ अन्वये व काढलेले नोटिफिकेशन क्रमांक भूसंपादन/कावि-६/२/एलक्यु/ एसआर/ १०/२००० दिनांक ०१ ऑक्टोंबर, २००१ च्या अनुषंगाने होणाऱ्या कार्यवाहीस स्थगिती देण्याची विनंती आहे.

०५. रिट पिटीशनची सुनावणी चालू असतांना व त्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत स.नं.१४८/१ क्षेत्र ५ हेक्टर ०२ आर ताबा घेऊ नये म्हणून मनाई हुकूम देणेत यावा.

०६. अर्जदाराला दाव्याचा खर्च देण्यात यावा.

याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा दिनांक २९ एप्रिल, २००२ रोजी खालील प्रमाणे आदेश झालेला होता.

".. .. सदर रिट पिटीशनची सुनावणी होऊन अंतिम निकाल होईपर्यंत स्थगिती देण्यात येत असून, जैसे थी ती स्थिती ठेवावी."

सदर रिट पिटीशनमध्ये संस्थानचे वकील श्री. आर.एन.धोर्डे यांच्या अभिप्रायानुसार श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे रिट पिटीशन फेटाळण्यात यावे, याबाबत तात्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री. पी.टी. जोशी यांचे प्रतिज्ञापत्र दिनांक १७ जून, २००२ रोजी दाखल करणेत आलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना सदर रिट पिटीशन मधील मनाई हुकूम उठविणेबाबत सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांना कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी देखील त्यांचे स्तरावरुन सदर रिट पिटीशन मधील स्थगिती आदेश उठविणेबाबत पाठपुरावा चालु ठेवला आहे.

(ड) श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके ह्या दिनांक ०५ ऑगस्ट, २००८ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना खालील प्रमाणे तीन मुली वारस आहेत.

१. श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर
२. श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे
३. सौ. सोनिया देवीदास पाटील.

उपरोक्त तीन वारसदार मुलींनी दिनांक ०१ एप्रिल २००९ रोजी इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिलेला असून त्यामध्ये खालील प्रमाणे नमुद केले आहे.

".. .. जिल्हा अहमदनगर, तालुका राहाता, मौजे शिर्डी येथील जमीन सर्व्हे नंबर १४८ क्षेत्र साडेबारा एकर अशा जमीनीवर श्री साईबाबा संस्थान यांचे आरक्षण आहे. आम्ही नामदार हायकोर्टात त्या विरुध्द रिट पिटीशन करुन स्टे घेतला आहे.

संस्थान संबधीत जमीनबाबत तडजोड करण्यास तयार असेल तर त्यानुसार श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दिड एकर क्षेत्र देण्यास तयार आहोत. मात्र आम्ही दिड एकर क्षेत्र संस्थानला बाजारभावाने खरेदी दिल्यास, राहिलेल्या संपुर्ण क्षेत्रावरील आरक्षण उठविण्यात आले पाहिजे. तसेच भविष्यात पुन्हा पुन्हा आमच्या जमीनीवर आरक्षण करण्यात येऊ नये. तडजोड झाल्यावर आम्ही रिट पिटीशन काढून घेऊ. तरी याबाबत योग्य तो निर्णय चर्चेत घेण्यात यावा. संबधीत विषय गेल्या अनेक वर्षापासून तडजोडीसाठी प्रलंबीत असून तडजोड मात्र होत नाही. सदर क्षेत्र आम्ही जमीनीच्या पश्चिम बाजुने देण्यास तयार आहे. तरी योग्य तो निर्णय घ्यावा, ही आपणांस विनंती."

संबधीत विषय तडजोड होणकामी अनेक वेळा पत्रव्यवहार झालेला आहे. तसेच याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी ठराव ही संमत करण्यात आलेले आहे. मात्र कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.

**सद्यस्थिती-** आता, कै. साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या प्रस्तुत जमिनीबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक ८१० हा या भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने झालेला निर्णय अंतिम असुन, तो खालील प्रमाणे -

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व इतर दोन यांचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ मधील क्षेत्र ०५ हे. ०२ आर चे भूसंपादनासंदर्भात मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या केसमध्ये होणाऱ्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. "

**(इ)** रिट पिटीशन ३९०/२ कै. साखरबाई हरीभाऊ शेळके व इतर विरुध्द सब डिव्हीजनल ऑफिसर श्रीरामपूर व इतर मध्ये दि. २५/०४/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी आदेश पारित केलेला असुन प्रस्तुत निकाल पत्रात खालील प्रमाणे आदेश झालेला आहे.

१. भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ व कलम ६ अन्वये काढलेल्या नोटीशीस दिलेले आव्हान कोर्टाने रद्द ठरविलेले आहे.

**२.** सदर भूसंपादनाबाबत दयावयाची नुकसान भरपाई THE RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION REHABILITATION AND RESETTLEMENT ACT २०१३ प्रमाणे देण्यात यावी.

**(फ)** वरील निकालानुसार किती नुकसान भरपाई रक्कम दयावी लागेल याबाबत माहिती देणेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांना इकडील दि. २३/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी क्र.कावि/भूसं/७९/२०१४ शिर्डी दि.०४/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये निकालात नमुद आदेश व नविन भूसंपादन कायदा सन २०१३ नुसार द्यावी लागणारी भूसंपादन मोबदला रक्कम खालील प्रमाणे हिशोबीत केली आहे.

१. प्रस्तुत प्रकरणात कलम ४ चे अधिसूचना प्रसिध्दी दिनांक १६/१०/२००० हा मुल्यांकन दिनांक आहे.

२. सह जिल्हा निबंधक वर्ग १ अहमदनगर यांचेकडील पत्र दि.३/२/२००१ नुसार स.नं. १४८/१ करीता विभाग क्र.७.१ डोऱ्हाळे रस्त्यास रुपये ४७० प्रती चौ.मी. मुल्यांकनासाठी मुल्यदर दिलेला आहे.

३. नविन भूसंपादन कायदा सन २०१३ हा दि.१/१/२०१४ पासून अंमलात आलेला आहे. त्यामधील कलम २४,२६ ते ३० तसेच शेडयुल १ प्रमाणे मोबदला रक्कम हिशोबीत केली आहे. ती खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जमिनीची किंमत क्षेत्र ४७५५० चौ.मी. | | रु. २२३४८५००/- |
| ब) | दिलासा रक्कम १०० % | | रु. २२३४८५००/- |
| क) | अतिरिक्त घटक (कांपोनंट) रक्कम<br>१२ % प्रमाणे १६/१०/२००० ते<br>१५/०८/२०१४, १३ वर्ष १० महिने १६६ % | | रु. ३७०९८५१०/- |
| | | एकूण | रु. ८१७९५५१०/- |
| ड) | आस्थापना खर्च ३ % | | रु. २४५३८६५/- |
| | | **एकूण** | **रु. ८४२४९३७५/-** |

**अक्षरी रुपये आठ कोटी बेचाळीस लाख एकोणपन्नास हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र.**

तसेच सदरची रक्कम शासनाकडे बिनव्याजी ठेव म्हणून सत्वर जमा करावी म्हणजे प्रस्तुत प्रकरणात पुढील कार्यवाही करता येईल असे कळविलेले आहे.

**(ग)** कै. साखरबाई हरीभाऊ शेळके मयत झालेल्या आहेत त्यांचे वारसदार श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर, श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व सौ. सोनिया देवीदास पाटील यांची मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील स.नं. १४८/१ क्षेत्र ४ हे. ७५ आर ५० चौ.मी. भूसंपादीत करणेकामी रक्कम रु. ८,४२,४९,३७५/- (अक्षरी रुपये आठ कोटी बेचाळीस लाख एकोणपन्नास हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र) बिनव्याजी ठेव (अनामत) म्हणून शासनाकडे (भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी) जमा करणेस तसेच सदर भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने करावे लागणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा.त्रिसदस्य समितीची मान्यता मिळालेनंतर सदरहु खर्च Major Financial असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन करावे लागेल.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०** **रु.२५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदार भक्तांच्या भोजन व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** "श्री साईबाबा संस्थानला रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) देणगीदार भक्तांची आरतीची व्यवस्था देणगी दिलेल्या दिवशी वा त्यांचे विनंतीनुसार इतर दिवशी एकदाच मोफत करण्यात यावी." असे नमुद केलेले आहे.

तथापि आरती बरोबरच देणगीदार साईभक्तांची देणगी दिलेल्या दिवशी श्री साईप्रसादालयामध्ये मोफत भोजनाची व्यवस्था केल्यास देणगीदार भाविकास प्रसाद भोजन मिळाल्याचा आनंद होईल, तसेच प्रसादालयाच्या मोफत अन्नदान योजनेचीही माहिती त्यांना होईल. प्रसादालयातील अन्नदानाचे भव्य काम बघून आपण दिलेल्या देणगीचा संस्थान योग्य वापर करत आहे याचीही खात्री देणगीदार साईभक्तांस होईल, पर्यायाने संस्थानच्या देणगीत वाढ होण्यास मदतच होईल.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भीय निर्णयास अधिन राहून रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांची देणगी दिलेल्या दिवशी दर्शन/आरती प्रमाणेच श्री साई प्रसादालयामध्ये व्ही.आय.पी. कक्षात एक वेळ मोफत प्रसाद भोजनाची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामध्ये देणगी पावतीची नोंद घेऊन करता येईल.

तरी वरील विषयावर मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा होऊन निर्णय होण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानला रु.२५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपात) देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांची देणगी दिलेल्या दिवशी दर्शन/ आरतीप्रमाणेच श्री साईप्रसादालयातील व्ही.आय.पी. कक्षामध्ये त्यांच्या कुटुंबासह एक वेळ मोफत प्रसाद भोजन व्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.११** **सन २०१४-२०१५ चे वार्षिक खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्याचे की, आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते यासाठी आवश्यक लागणाऱ्या साहित्याची खरेदी वारंवार करण्यापेक्षा आवश्यक साहित्याची वार्षिक खरेदी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागाकडील स्वच्छता साहित्य वापरुन संपत आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय कं. २४२ ने रु. ६,००,०००/- मात्रचे खरेदीस मान्यता दिलेली आहे. सदरची कार्यवाही चालू आहे. सदरचे साहित्य व विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य मिळून ऑगस्ट २०१४ अखेर पर्यंत वापरासाठी पुरेसे आहे. तो पर्यंत सन २०१४-२०१५ (सप्टेबर-२०१४ ते मार्च-२०१५) या कालावधीसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदीची कार्यवाही पुर्ण होईल.

जानं.एसएसएस/वशी-खरेदी/४०३८/२०१४दि.०८/०३/२०१४ चे परिपत्रकान्वये सन २०१४-२०१५ करिता आरोग्य विभागाचे दैनंदिन कामासाठी आवश्यक असणारे साहित्य व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चास मा. व्यवस्थापन समिती/मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेवून सदर प्रस्ताव खरेदी विभागाकडे सादर करणेबाबत खरेदी विभागाने कळविले आहे.

आरोग्य विभागासाठी सन २०१४-२०१५ करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची यादी सोबत परिशिष्ट **अ** जोडले आहे. परिशिष्टातील अ.नं. ०१ ते २३ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रु.२०,०३,४५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरची साहित्य खरेदी खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने निविदा मागवून करावी लागेल.

सोबतचे परिशिष्टातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम ही मोठ्या स्वरुपाची असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे सिव्हील ॲप्लीकेशन नं. पी.आय.एल.नं. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ वर मं. कोर्टाने दि. १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी सोबतचे परिशिष्टातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये २०,०३,४५०/- (अक्षरी रुपये विस लाख तिन हजार चारशे पंन्नास मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.५७५** **सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन सुधारित प्रस्ताव तयार करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.१२** **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षास व या कक्षामध्ये कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत/ भूसंपादन कक्ष सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षास व या कक्षात कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडील दिनांक १४ एप्रिल, २०१४ रोजीचे मंजूर टिपणीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर करणेत आला होता.

सदरचे प्रस्तावावर, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ जून, २०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४४३ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

.. यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील त्यांचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षामधील काम सध्या बंद असल्यामुळे या कक्षातील कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ व मानधन वाढ देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.

तथापि, सदरचा भू-संपादन कक्ष दिनांक ०१.०६.२०१४ पासून बंद करणेत यावा तसेच या कक्षास व कक्षातील कर्मचाऱ्यांना दि.३१.०५.२०१४ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येऊन, त्यांचे पगार/ वेतन संबंधितांना आदा करणेत यावे, असे ठरले.

या निर्णयास अनुसरुन, सामान्य प्रशासन शाखेकडील दिनांक १३ जून, २०१४ रोजीचे पत्राने, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना, त्यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष दिनांक ०१ जून, २०१४ पासून बंद करणेत येत असलेबाबत तसेच या कक्षात काम करणाऱ्या ०५ कंत्राटी कर्मचाऱ्यांना कर्मचारी ठेकेदाराकडे वर्ग करणेबाबत आणि उर्वरित मानधन तत्वावरील कंत्राटी सल्लागार व अव्वल कारकुन यांच्या सेवा संपुष्टात आणणेत येत असलेबाबत कळविणेत आलेले आहे.

तथापि आता, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक १३ जून, २०१४ व दिनांक २५ जून, २०१४ नव्याने फेरप्रस्ताव देऊन, त्यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष सुरु ठेवणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. याबाबतचे सविस्तर विवेचन खाली परिच्छेद क व परिच्छेद ड मध्ये नमूद केले आहे.

तत्पूर्वी मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी (पुर्वीचे श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर) यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षाची पूर्वपीठीका खाली परिच्छेदात नमुद केली आहे.

**(ब) विषयाची पूर्वपीठीका:** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता पुर्वीच्या मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसुल) यांचे पर्यवेक्षणाखली त्यांचे श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्ष स्थापन करणेत आलेला होता.

तथापि, आता मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन / कार्या/ १६-क / १०८५ / २०१३, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने नवनिर्मित शिडी उपविभागीय कार्यालय यांचेकडेस त्यांचे अधिनस्त असलेल्या तालुक्यातील भूसंपादन प्रस्ताव हस्तांतरीत करणेत आलेली आहेत. तसेच या आदेशाने मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा उपरोक्त भूसंपादन कक्ष कर्मचारी वृंदासह मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे अधिनस्त देणेत आलेला आहे.

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ ते १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित भूसंपादन कक्षासाठी खालीलप्रमाणे कर्मचारीवृंद मंजूर करणेत आलेला होता. सदरचा कक्ष श्रीरामपूर उपविभागीय कार्यालयात दिनांक ०२ ऑगष्ट, २००० रोजी कार्यान्वीत झाला. या कक्षात काम करणारे कर्मचाऱ्यांना संस्थान आस्थापना विभागाकडील दिनांक २७ ऑगष्ट, २००० रोजीचे मंजूर टिपणीनुसार या कक्षातील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे मानधन / वेतन देणेस मंजुरी देणेत आली :

| अ.नं. | तपशील | मागणी/ मंजूर पद संख्या | सुरुवातीस देण्यात येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी (ज्यांना मराठी टंकलेखन व संगणकाचे ज्ञान आहे) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन चालक | ०१ | ४०००/- |

तद्नंतर विषयांकित भूसंपादन कक्षास वेळोवेळी मुदतवाढी देणेत आल्या तसेच कर्मचाऱ्यांचे मंजुरीत व वेतन/ मानधनात बदल करणेत आले. दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर विषयांकित कक्षात खालीलप्रमाणे कर्मचारीवृंद काम करीत असून त्यांना त्यांचे तपशीलापुढे नमुद केलेनुसार वेतन / मानधन देणेत आले आहे :

| अ.नं. | तपशील | मंजूर पद संख्या | दिनांक ३१ मे, २०१४ अखेर प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.बी.आर.वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसिलदार | ०१ | १०,०००/- (एकत्रित) |
| ०२ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकुन | ०१ | ०७,०००/- (एकत्रित) |
| ०३ | लिपीक टंकलेखक संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०४ | किमान वेतन कायद्याप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन |
| ०४ | शिपाई संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०१ | किमान वेतन कायद्याप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन |

यापुर्वी, मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे दिनांक २१ जून, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५२० नुसार, विषयांकित कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना आहे त्याच मानधनावर व अटी/ शर्तीवर त्यांची मुदत संपुष्टात आलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली होती, ती दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी संपुष्टात आली आहे.

दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच दिनांक ०५ जून, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४३ अन्वये, मा. त्रिसदस्यीय समितीने, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या विषयांकित भूसंपादन कक्षास मुदतवाढ व मानधन वाढ देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करुन, सदर कक्षातील कर्मचाऱ्यांना दिनांक ३१ मे, २०१४ पर्यन्त (एक महिना) मुदतवाढ देऊन वेतन/ पगार आदा करणेस मान्यता दिलेली आहे.

या निर्णयास अनुसरुन, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक १३ जून, २०१४ रोजीचे लेखी पत्राव्दारे, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना त्यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष बंद करुन, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा संस्थानच्या कर्मचारी ठेकेदाराकडे वर्ग करणेस व इतर ०२ कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी सल्लागार/ अव्वल कारकुन यांच्या) सेवा संपुष्टात आणणेत येत असलेबाबत कळविणेत आलेले आहे.

**(क) तथापि आता,** मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील मुळ प्रस्ताव जावक क्रमांक कावि/भूसं/८३/२०१४, दिनांक १३ जून, २०१४ व पुरवणी प्रस्ताव जावक क्रमांक कावि/ भूसं/ ४८५/ २०१४, दिनांक २५ जून, २०१४ रोजीचे पत्राव्दारे केलेल्या विनंतीचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

.. त्यांचे कार्यालयाकडे सध्या चालू असलेली १६ प्रकरणे यापैकी श्री साईबाबा संस्थानचे तीनही प्रकरणाची सद्य:स्थिती अंतिम टप्प्यात आलेली आहे. १ प्रकरणात मोबदला वाटप करणे व ताबा देणे-घेणे बाकी आहे, १ प्रकरणात मा. हायकोर्ट औरंगाबाद यांचा निकाल झाला सून कोर्ट आदेशाप्रमाणे प्रारुप निवाडा तयार करणेवर आहे. १ प्रकरणात शासनाचे आदेशाप्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन दुरुस्त प्रारुप निवाडा तयार करणेवर आहे.

वरीलप्रमाणे भूसंपादन प्रकरणांची सद्य:स्थिती आहे. ही भूसंपादन प्रकरणे जलद गतीने निपटारा होणेसाठी, भूसंपादन कक्ष या कार्यालयात चालू ठेवून, या कार्यालयात यापुर्वी कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांपैकी सल्लागार यांना ०१ वर्षाची म्हणजेच दिनांक ०१ मे, २०१४ ते ३० एप्रिल, २०१५ पर्यन्त मुदतवाढ देणेस विनंती आहे. तसेच कंत्राटी कुशल कर्मचारी ३ (लिपीक-टंकलेखक २ + वाहनचालक १) व अकुशल कर्मचारी १ (शिपाई) यांना पुढील आदेश होईपावेतो मुदतवाढ मिळणेस विनंती आहे.

थोडक्यात, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी उपरोक्त प्रस्तावात, त्यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष सुरु ठेवुन/ भूसंपादन कक्षास मुदतवाढ देऊन, या

कक्षासाठी ०१ सल्लागार, ०३ कंत्राटी कुशल व ०१ कंत्राटी अकुशल असे एकुण ०५ कर्मचाऱ्यांची मागणी केलेली आहे तसेच सल्लागार यांना रुपये १२,०००/- मात्र एकत्रित मानधन व इतर कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे वेतन मिळावे म्हणून कळविले आहे.

**(ड)** उपरोक्त **परिच्छेद क** नमुद केलेले मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे प्रस्तावांबाबत उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी दिनांक २५ जून, २०१४ रोजीचे टिपणी-वजा-सविस्तर अहवालाव्दारे अभिप्राय दिलेला आहे, त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे :

.... (मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी) यांनी दिनांक १३ जून, २०१४ व २५ जून, २०१४ रोजीचे पत्रात उल्लेख केलेप्रमाणे सल्लागार म्हणून श्री. रामचंद्र भानुदास नागरे यांचे नाव कळविणेत आलेले आहे. मात्र सल्लागार हे पद नायब तहसिलदार संवर्गातील मंजुर असुन श्री. नागरे हे अव्वल कारकुन या संवर्गातील आहेत. भूसंपादन कक्ष पुन्हा सुरु करावयाचा असल्यास नायब तहसिलदार संवर्गातील सल्लागार ०१ + अव्वल कारकुन संवर्गातील अव्वल कारकुन ०१ + लिपीकाचे कामासाठी कंत्राटी कुशल कर्मचारी ०२ + वाहनचालकाचे कामासाठी कंत्राटी कुशल कर्मचारी ०१ + कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई म्हणून अकुशल कंत्राटी कर्मचारी ०१ असे एकुण ०६ कर्मचारी असावेत.

तसेच मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी सुचित केल्याप्रमाणे तसेच कोणत्या अटी व शर्तीनुसार भूसंपादन कक्ष चालू ठेवावा याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करुन त्यांचे निर्णयानुसारव निर्देशानुसार उचित निर्णय घेणेत यावा, ही विनंती.

**(इ) उपरोक्त बाबींस अनुसरुन, विषयांकित प्रस्तावाबाबत थोडक्यात विवेचन / गोषवारा असा की,**

**०१.** मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षास दिनांक ०१ मे, २०१४ पासून मुदतवाढ देणेचा पुर्वीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०५ जून, २०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार अमान्य केलेला आहे व त्यानुसार संस्थान प्रशासनाने संबंधितांना दिनांक १३ जून, २०१४ रोजीचे पत्राने कळविलेले आहे.

**०२. आता,** मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक १३ जून, २०१४ व दिनांक २५ जुन, २०१४ रोजीचे फेरप्रस्तावाव्दारे, त्यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष सुरु ठेवून, या कक्षासाठी सल्लागार १, कंत्राटी कुशल कर्मचारी ३ व अकुशल कर्मचारी १ (शिपाई) असे एकूण ०५ कर्मचारी वर्गाची मागणी केलेली आहे. म्हणजेच, त्यांनी भूसंपादन कक्षास दिनांक ०१ मे, २०१४ ते ३० एप्रिल, २०१५ अखेरपर्यन्त मुदतवाढ देणेची विनंती केलेली आहे.

**०३.** विषयांकित भूसंपादन कक्षाकडे, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, पुर्वी कंत्राटी सल्लागार हे पद नायब तहसिलदार संवर्गातील मंजूर होते व त्यांना सहाय्यक म्हणून अव्वल कारकुन संवर्गातील कंत्राटी कर्मचारी देणेत आलेला होता. तथापि आता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील फेरप्रस्तावानुसार सल्लागार म्हणून पुर्वी या कक्षात अव्वल कारकून म्हणून काम केलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्याची कंत्राटी सल्लागार म्हणून मागणी करुन, त्यांना रुपये १२,०००/- मात्र एकत्रित मानधन द्यावे व इतर कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे वेतन द्यावे म्हणून कळविले आहे.

उपरोक्त सर्व विवेचनाचा विचार करतां, मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०५ जून, २०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला भूसंपादन कक्ष बंद करणेबाबत निर्णय घेतलेला आहे,

तथापि, आता मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक १३ जून, २०१४ व दिनांक २५ जून, २०१४ रोजी फेरसादर केलेल्या प्रस्तावानुसार व त्यावर बांधकाम विभागाने दिलेल्याअभिप्रायानुसार,

**०१.** मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिडी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला विषयांकित भूसंपादन कक्ष सुरु ठेवावा किंवा कसे, सुरु ठेवावयाचा झाल्यास त्याचा कालावधी निश्चित करणे,

**०२.** विषयांकित कक्षासाठी त्यांनी मागणी केलेप्रमाणे किती कर्मचारी उपलब्ध करुन देणेत यावे,

**०३.** विषयांकित कक्षासाठी कर्मचारी उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास, कंत्राटी सल्लागार/ अव्वल कारकुन यांना द्यावयाचे दरमहाचे एकत्रित मानधन तसेच उर्वरित कुशल-अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन ठरविणे,

आदि बाबी धोरणात्मक निर्णयाच्या असल्याने, यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.५७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, त्रिसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेमध्ये, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिडी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला विषयांकित भूसंपादन कक्ष बंद करणेबाबत झालेला निर्णय क्र.४४३ रद्द करणेत येऊन, सदरचा भू-संपादन कक्ष पुढील एक वर्ष कालावधीसाठी सलग सुरु ठेवणेत यावा. तसेच या कक्षामध्ये त्यांचे मागणीप्रमाणे ०१ कंत्राटी सल्लागार (अव्वल कारकुन) ०२ कुशल व ०१ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येऊन, या कर्मचाऱ्यांना पुर्वीप्रमाणेच मानधन/ महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे वेतन आदा करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१३ मागासवर्ग कक्ष समितीमध्ये मा.उपकार्यकारी अधिकारी यांचा समावेश करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीतील कर्मचा-यांसाठी सन २००४ चा अधिनियम क्रं.०८ हा खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, निरधीसुचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि नागरीकांच्या इतर प्रवर्ग मधील इतर व्यक्तीसाठी लोकसेवा मधील पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरीता आणि तत्संबंधीत व तदनुशंगीक बाबींसाठी तरतुद करण्याकरीता अधिनियमः-

या अधिनियमास अनुसरुन तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७ डिसेंबर, २००४ रोजी सभेत विषय नं.४३ निर्णय क्रं.१७० अन्वये मागास व इतर मागास वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत अधिनियम क्रं.०८ चे अनुपालन करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना पदोन्नती देतांना सदर अधिनियमातील मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेवून पदे भरावी लागतील. यांस महाराष्ट्र अधिनियम क्रं.०८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे, असा निर्णय पारीत झालेला आहे.

शासकीय कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या रेकॉर्ड प्रमाणे १०० बिंदु नामावलीनुसार सरळसेवा व पदोन्नतीबाबतची कार्यवाही करणे, तत्संबंधी शासकीय विहीत नमुन्यात कार्यालयीन रेकॉर्ड तयार करणे याकामी आस्थापना विभागातील कर्मचा-यांनी मा.विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे समक्ष भेट दिली होती त्या भेटीत संबंधित अधिका-यांनी विस्तृत माहीती देऊन दिनांक २३ फेब्रुवारी,२०१३ रोजी समक्ष शिर्डी कार्यालयास भेट देऊन मार्गदर्शन करुन मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत सुचविलेले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१ जुन,२०१३ चे सभेतील विषय क्रं.८८ निर्णय क्रं.५२१ अन्वये, शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार अमंलबजावणी करणेकामी खालील प्रमाणे मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यास तसेच मागासवर्ग समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग जा.नं.एसएसएस/वशी/०१/६८३/२०१३ दि.१२ऑगस्ट,२०१३ अन्वये खालील प्रमाणे मागासवर्ग कक्ष समिती गठीत करण्यात आली-

**अध्यक्ष :-** कार्यकारी अधिकारी

**सदस्य सचिव :-** प्रशासकीय अधिकारी,आस्थापना

**सदस्यः-** अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग

**सदस्य :-** मुख्यलेखाधिकारी

**सदस्यः-** एच आर मॅनेजर,साईबाबा हॉस्पिटल

**सदस्यः-** कामगार अधिकारी, श्री साईबाबा संस्थान वि.शिर्डी

**सदस्यः-** प्राचार्य,औ.प्र.संस्था/ प्राचार्या सा.ज्यु.कॉलेज/प्राचार्या इं.मि.स्कुल/मुख्याध्यापिका सा.क.मंदिर

**सदस्यः-** मागासवर्गीय अधिकारी :- श्री.बी.डी.साबळे, प्रशासकीय अधिकारी

**सदस्यः-** मागासवर्गीय कर्मचारी श्री.व्ही.डी.थोरात

उपरोक्तप्रमाणे गठीत केलेल्या मागासवर्ग समितीने कामकाजाची सुरुवात केलेली आहे. समितीने नियमित सभा घेणे अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कारभारात मोठया प्रमाणात वाढ होत आहे तसेच विविध विकास कामे सुरु आहेत. त्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी यांचे दैनंदिन कामकाजात वाढ झालेली आहे. मागासवर्ग समितीचे कामकाज सुरुळीत व वेळेत होण्याचे दृष्टीने उपकार्यकारी अधिकारी यांना मागासवर्ग समितीत उपाध्यक्षपदी घेता येईल, असे नम्र मत आहे. जेणे करुन मा.कार्यकारी अधिकारी यांचे

अनुपस्थितीत मा.उपकार्यकारी अधिकारी हे मागासवर्ग समितीचे सभेत कामकाज पाहु शकतील व मागासवर्ग कक्षाची कामे वेळेवर होणेस जास्त मदत होईल.

तरी उप कार्यकारी अधिकारी यांचा मागासवर्ग समितीत उपाध्यक्ष पदी समावेश करणेकामी आजचे मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेमध्ये निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मागास वर्ग विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४ नवीन पाच बसेसचे रजिस्ट्रेशन व टॅक्स खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त, श्री. के. व्ही. रमणी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिरडी साई ट्रस्ट, साईनगर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता दि.२९/०५/२०१४ रोजी आयशर कंपनीच्या पाच बसेस देणगी दिलेल्या आहेत.

सदर बसेसचा वापर साईआश्रम भक्तनिवासस्थान येथून साईआश्रम धर्मशाळा व नवीन भक्तनिवास येथुन साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय ने-आण करणे कामी करण्यात येणार आहे. बसेसचा वापर चालु करणेपुर्वी आर.टी.ओ. कार्यालयात टॅक्स रक्कम, रजिस्ट्रेशन फी, फिटणेस फी व परमिट फी आवश्यक आहे.

पाच बसेसची टॅक्स रक्कम, रजिस्ट्रेशन फी, फिटणेस फी व परमिट फी भरणे कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **टॅक्स रक्कम (रु.)** | **रजिस्ट्रेशन फी (रु.)** | **फिटणेस फी (रु.)** | **परमिट फी (रु.** | **एकुण रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| १,६८,०००.०० | २,५००.०० | २,०००.०० | २,५००.०० | **१,७५,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे नवीन पाच बसेसची टॅक्स रक्कम, रजिस्ट्रेशन फी, फिटणेस फी व परमिट फी भरणे कामी रु.१,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्याहत्तर हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर फीची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात वेगवेगळया तिन काऊंटरवर रोखीने भरावी लागणार आहे. सदर खर्च मोटारकार खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

तरी वरील प्रमाणे नवीन पाच बसेसची टॅक्स रक्कम, रजिस्ट्रेशन फी, फिटणेस फी व परमिट फी आर.टी.ओ. कार्यालयात भरणे कामी रु.१,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्याहत्तर हजार) मात्र पर्यंतचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित पाच बसेसची टॅक्स रक्कम, रजिस्ट्रेशन फी, फिटनेस फी व परमिट फी आर.टी.ओ. कार्यालयात भरणेस व याकामी येणाऱ्या रु.१,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ संरक्षण विभागासाठी सफेद प्लॅस्टीक खुर्च्या खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री चे आरतीकरिता ऑनलाईन पासचे जे साईभक्त शनि मंदिरजवळ उभे राहून लाईन लावतात सदरची लाईन तेथे न लावता लाईनमधील भक्तांना आरतीकरिता अभिषेक हॉल येथे खुर्च्या टाकून बसण्यात यावे असे मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांना तोंडी सूचनेनुसार इकडील कार्यालयात कळविले होते. त्यानुसार सा. भ. निवासस्थान विभागाकडून ५० नग "नीलकमल" कंपनीच्या फायबर खुर्च्यांची मागणी केलेली होती. तसेंच सदर खुर्च्या अपुऱ्या पडत असल्याने संरक्षण विभाग जनरल डी.पी. १६१८७, दि. ५/११/२०१३ ने परत १५० खुर्च्यांची मागणी केलेली होती. त्यानुसार संरक्षण विभागाकडे साईभक्त निवासस्थान विभागाच्या एकूण २०० नग खुर्च्या संरक्षण विभागाचे ताब्यात आहेत.

तथापि, साईबाबा भक्त निवासस्थान विभागाने सदरच्या खुर्च्या जमा करणेंबाबत कळविले आहे. सदरच्या खुर्च्या साईबाबा भक्त निवासस्थान हे प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन (कामगार दिन) व स्वातंत्र दिन या निमित्त ध्वजारोहण पटांगणावर तथा, संस्थानचे अन्य कार्यक्रमासाठी सन्मानीय व्यक्ती तथा, अतिथीचे बैठक व्यवस्थेसाठी सदरच्या खुर्च्या पुरवाव्या लागतात. त्यामुळे संरक्षण विभागाकडील २०० नग खुर्च्या ताबडतोब जमा कराव्यात असे कळविले.

तरी सदरच्या खुर्च्या सा. भ. निवासस्थान विभागास जमा केल्यास ऑनलाईन भक्तांना शनिमंदिराजवळ पूर्वी सारखेच उभे राहावे लागेल. तरी सदरच्या भक्तांना सध्या असलेल्या २०० नग खुर्च्या अपुऱ्या पडत असून आणखी ५० नग खुर्च्यांची आवश्यकता आहे. तरी "नीलकमल" कंपनीच्या मोलडेड पांढऱ्या रंगाच्या २५० नग खुर्च्या स्वातंत्रदिनाच्या पूर्वी खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर खुर्ची खरेदी करण्यासाठी प्रती नग ३२०/- मात्र खर्च असे एकूण २५० नग खुर्च्यां खरेदी करण्यासाठी ८०,०००/- मात्र (अक्षरी रुपये - ऐंशी हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. संरक्षण विभागाचे चालू आर्थिक अंदाजपत्रकात संरक्षण खर्च १,४०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी चाळीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी ऑनलाईन पासधारक भक्तांना वेटींग हॉल येथे आवश्यक असलेल्या २५० नग खुर्च्यां खरेदी करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ८०,०००/- मात्र (अक्षरी रुपये- ऐंशी हजार मात्र) च्या खर्चास मान्यता मिळणेस व २५० नग खुर्च्यां खरेदी करण्याची पुढील कार्यवाही खरेदी विभागामार्फत करणेसाठी सदर विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६ द्वारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे. त्यानुसार सर्वसमाविष्ठ द्वारावती प्रकल्पासाठी रु.४.५ कोटी खर्च अपेक्षित आहे. तुर्त सध्याची तातडीची आवश्यकता लक्षात घेता भक्तनिवासस्थानचे खालील ठिकाणी कॅमे-याची आवश्यकता आहे.

01. मेनगेट – ०४ नग
02. तळमजला (पॅसेज) - ०४ नग
03. कॅन्टीन – ०२ नग
04. काऊंटर – ०२ नग
05. जिना व लिफ्ट - ०२ नग

सध्या असे एकुणन १४ कॅमे-याची आवश्यकता आहे. त्याचा **Backup** हा तीन दिवसासाठी उपलब्ध राहील. त्यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. No | Specification | Brand | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Outdoor IP IR Camera<br>- Sony Super HAD II<br>- 8 mm HD Lens<br>- 2Mega Pixel camera<br>- distance - 30M<br>-network support -TCP/IP.HHTP, DHCP<br>-3 years onsite comprehensive warranty | SONY | 14 |
| 02 | 24 CH NVR/DVR<br>- 24 IP camera input, 1BNC, HDMI<br>- Display split -1,8,16,14<br>- 2TB SATA HDD.<br>- DVD writer<br>- USB port,<br>- Network support | - | 01 |
| 03 | 2 KVA UPS.<br>3 Years onsite warranty | APC | 01 |
| 04 | 32 Inch. LED TV<br>3 Years onsite warranty | LG | 01 |
| 05 | All necessary condut/PVC Cat-6 cabling for data & power for said project | - | As requirement |
| 06 | Installation & labour charges | - | One time |
| 07 | Tech support of one technician | - | 3 year ( warranty period) |

वरील सदरच्या कामासाठी एकंदरीत ३.६५ लाख + टॅक्स खर्च अपेक्षित आहे व दोन टेक्नीशियनसाठी दरमहा २० हजार + टॅक्स हा वॉरंटी कालावधीत (प्रकल्प पुर्ण झालेवर, पुढील ३६ महिन्यासाठी ) खर्च करावा लागेल. सदर प्रकल्प वर्कऑर्डर दिल्यानंतर, प्रकल्प ६५ दिवसात पुर्ण करता येईल.

उपरोक्तप्रमाणे, द्वारावती भक्तनिवासस्थान परिसरात १४ कॅमेरे बसविण्यासाठी एकत्रित ३.६५ लाख + टॅक्स व दोन टेक्नीशियनसाठी येणा-या मासिक खर्चाच्या मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५८० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१७ साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे. त्यानुसार सर्वसमाविष्ठ द्वारावती प्रकल्पासाठी रु. ४.५ कोटी खर्च अपेक्षित आहे. परंतु सध्याचे आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही यंत्रणा बसविता येईल. त्यानुसार संबंधीत ठिकाणी पहाणी करुन व विभागाप्रमुखांशी चर्चा करण्यात आली आहे.

सध्याची तातडीची आवश्यकतेनुसार २१ कॅमेरेची आवश्यकता आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

01. बस स्टॉप – ०४ नग
02. टोकन काऊंटर/प्रवेशद्वार - ०३ नग
03. इनगेट - ०१ नग
04. वेटींग हॉल - ०५ नग
05. बुकींग काऊंटर (आतील व बाहेरील बाजु) – ०४ नग
06. भोजन व्यवस्था - ०२ नग
07. भोजन/कॅन्टीन (बुकींग काऊटर) - ०२ नग

असे एकुण २१ कॅमे-याची आवश्यकता आहे. त्याचा Backup हा तिन दिवसासाठी उपलब्ध राहील. यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr.No | Specification | Brand | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Outdoor IP IR Camera<br>- Sony Super HAD II<br>- 8 mm HD Lens<br>- 2Mega Pixel camera<br>- distance - 30M<br>-network support -TCP/IP.HHTP,DHCP<br>-3 years onsite co mprehensive warranty | SONY | 14 |
| 02 | 24 CH NVR/DVR<br>-24 IPcamera input,1BNC, HDMI<br>- Display split -1,8,16,14<br>- 2TB SATA HDD.<br>- DVD writer<br>- USB port,<br>- Network support | - | 01 |
| 03 | 2 KVA UPS.<br>3 Years onsite warranty | APC | 01 |
| 04 | 32 Inch. LED TV<br>3 Years onsite warranty | LG | 01 |
| 05 | All necessary condut/PVC<br>Cat-6 cabling for data & power for said project | - | As requirement |
| 06 | Installation & labour charges | - | One time |
| 07 | Tech support of one technician | - | 3 year (warranty period) |

वरील सदरच्या कामासाठी एकंदरीत ४.६० लाख + टॅक्स खर्च अपेक्षित आहे व तीन टेक्नीशियनसाठी दरमहा ३० हजार + टॅक्स हा वॉरंटी कालावधीत (प्रकल्प पुर्ण झालेवर, पुढील ३६ महिन्यासाठी ) खर्च करावा लागेल. सदर प्रकल्प वर्कऑर्डर दिल्यानंतर, प्रकल्प ६५ दिवसात पुर्ण करता येईल.

उपरोक्तप्रमाणे, द्वारावती भक्तनिवासस्थान परिसरात २१ कॅमेरे बसविण्यासाठी एकत्रित ४.६० लाख + टॅक्स व दोन टेक्नीशियनसाठी येणा-या मासिक खर्चाच्या मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१८ जनसंपर्क विभागाचे कार्यालयासाठी कॅमेरा बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** जनसंपर्क विभाग हे मंदिर परिसर सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणेपासुन दुर असल्यामुळे तेथे सेंट्रल यंत्रणेद्वारे दोन कॅमेरे बसविणे अवघड आहे. यासाठी विनाकारण मंदिर परिसरात तोडफोड करावी लागणार आहे. सदरचा पर्याय खर्चीक ठरु शकतो त्याएवजी त्यांना सवलतीचे दरात दोन कॅमेरे उपलब्ध करुन देता येईल व त्या कॅमे-यांचे प्रक्षेपण/नियंत्रण त्या विभागात ठेवता येइल.

| Sr. no | Specification | Brand | Qty. |
|---|---|---|---|
| 01. | Outdoor Camera<br>- Sony Super HAD II<br>- 750 - TVL<br>- distance - 30M<br>- network support<br>- TCP/IP.HHTP,DHCP<br>3 years onsite comprehensive warranty | SONY | 02 |
| 02. | DVR-<br>- 8 camera input,1BNC,HDMI<br>- Display split -1,8<br>- 2TB SATA HDD.<br>- DVD writer<br>- USB port,<br>- Network support<br>3 years onsite comprehensive warranty | - | 01 |
| 03. | All necessary conduct/PVC cabling for data & power for said project | - | As requirement |
| 04. | Installation & labour charges | - | One time |
| 05. | 1 KVA UPS<br>3 years onsite comprehensive warranty | - | APC |

वरिलप्रमाणे दोन कॅमेरा व एक DVR साठी साधारणत: अंदाजे रु. ७५,०००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे व याकामी लागणारा टिव्ही संस्थानचे ध्वनीक्षेपण विभागामार्फत कार्यवाही पुर्ण करावी लागणार आहे.

तरी उपरोक्त विवेंचनानुसार जनसंपर्क विभागासाठी लागणारे दोन कॅमेरे व एक DVR खरेदी करणेकामी येणा-या रु. ७५,०००/- + टॅक्स मात्र खर्चाचे मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१९ श्री साईबाबा पालखी सोहळा समितीचे वतीने श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांनी दि.१६/०६/२०१४ रोजी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१४ मध्ये उत्सवाचे मुख्य दिवशी दि.१२/०७/२०१४ रोजी समाधी मंदिर व परिसरामध्ये हेलीकॉप्टरने पुष्पवृष्टी करणेबाबत परवानगी मागितलेली आहे. तसेच त्यांचे पालखीचे यंदा २६ वे वर्ष असून यावर्षी पालखी सोहळा समितीने श्रीसाईबाबांच्या कृपाशिर्वादाने व सर्व साईभक्तांच्या सहकार्याने नविन जर्मन सिल्व्हरचा रथ बनविण्यात आला असून त्याचे निमीत्त साधुन यावर्षी पालखी सोहळा समिती दि.०२जुलै,२०१४ रोजी पुण्यातून पालखी प्रस्थान करणार असून त्या दिवशी पुण्यामध्ये कसबा गणपती व येरवडा येथे श्री साईबाबांच्या कृपाशिर्वादाने हेलिकॉप्टरव्दारा पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. तसेच दि.१२ जुलै, २०१४रोजी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्रीसाईबाबा पालखी सोहळा, समिती, पुणे यांचेमार्फत श्रीसाईबाबा समाधी मंदिरावर हेलिकॉप्टरव्दारा पुष्पवृष्टी करण्याचे योजिले आहे. त्यांना हेलीकॉप्टरव्दारा पुष्पवृष्टी करण्यास परवानगी मिळावी तसेच या पुष्पवृष्टीसाठी ज्या काही कायदेशीर बाबी आहेत त्याचे ते तंतोतंत पालन करणार असल्याचे पत्राव्दारे लेखी कळविलेले आहे.

यापुर्वी सन-२००६,२००७,२००८ व २००९ या चार वर्षामध्ये ओ.एस.एस एविएशन प्रा.लि., भोपाळ यांना श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी हेलीकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यास परवानगी देण्यात आलेली होती. त्यावेळी हेलीकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टीसाठी वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली होती. सन-२०१० मध्येही ओ.एस.एस.एविएशन प्रा.लि., भोपाळ यांनी पुन्हा अशाच पद्धतीची परवानगी मागितली होती परंतु, सन-२००९ मध्ये पुष्पवृष्टीचे वेळी हेलीकॉप्टर समाधी मंदिर कळसाचे जवळ आल्याचे निदर्शनास आलेले होते. हेलीकॉप्टर समाधी मंदिर कळसाचे जवळून गेल्याने कळसास

धक्का लागुन जाण्या इतके जवळुन गेले होते. त्यामुळे धोका निर्माण झाला होता. तसेच जमिनीपासून कमी उंचीवरुन गेल्याने सर्वत्र धुळच-धुळ उडालेली होती. मंडपाचे छत / ताडपत्र्या या जोर-जोरात हालत होत्या. या सर्व बाबींमुळे लहान मुले घाबरणे, भक्तांचे डोळ्यात धुळ जाणे, अपघाताने मंडप कोसळुन भक्तांना त्रास/ दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्सव काळात साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली असते. हेलीकॉप्टर जमीनीपासून कमी अंतराने गेल्यास उपरोक्तप्रमाणे भक्तांमध्ये घबराट निर्माण होऊन पळापळ झाल्यास चेंगराचेंगरीमध्ये अनर्थ घडण्याची शक्यता निर्माण होईल. असे होऊ नये, तसेच याबाबत शिर्डी ग्रामस्थांनीही पुष्पवृष्टी करु नये अशी तक्रार केली होती. त्यामुळे ओ.एस.एस.एविएशन, यांना समाधी मंदिराचे कळसाचेवर ७५-१०० फुट उंचावरुन पुष्पवृष्टी करण्यास परवानगी देण्यात आली होती व त्याच बरोबर त्यांना शिर्डी पोलीस स्टेशन व संस्थानचे संरक्षण कार्यालय व इतर एजन्सी यांची परवानगी घेणेबाबत पत्राने कळविण्यात आले होते. परंतु, त्यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही व सदर वर्षी पुष्पवृष्टी करण्यात आलेली नव्हती.

त्यानंतर सन-२०१२चे श्रीरामनवमी उत्सवाचे वेळी श्री.अशोक अण्णासाहेब शिंदे, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सिल्वर जुबिली ट्रॅव्हलर लि., पुणे यांनीही अशाच पद्धतीने पुष्पवृष्टी करणेबाबत परवानगी मागितली होती. त्यावेळी त्यांना जा.क्र.मंदिर/५२६६/२०१२,दि.२१.०१.२०१२ अन्वये त्यांना शिर्डी पोलीस स्टेशन तसेच इतर मंजूरी घेण्यास कळविले होते. त्यानंतर सदर मंजूऱ्या संस्थानकडे सादर केल्यानंतर त्यांना परवाणगी देणे अगर नाकारणेबाबत विचार केला जाईल असे कळविण्यात आले होते. परंतु, त्यांना सदर परवानगीचे कागदपत्राची पूर्तता वेळेत करता आलेली नव्हती. तसेच त्यावेळी पुष्पवृष्टी झालेली नव्हती.

मागील वर्षी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ मध्ये श्रीसाईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांनी हेलीकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करणेसाठी संस्थानकडे अर्ज केला होता. परंतु, पुष्पवृष्टी करणेबाबतचा त्यांचा अर्ज नाकरण्यात आला होता. त्याबाबत त्यांना जा.क्र.एसएसएस/ मंदिर /१८६१ /२०१३, दि.१८/०६/२०१३ अन्वये कळविण्यात आले होते.

तरी आता श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२०१४ मध्ये हेलीकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करणेबाबत श्रीसाईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांचा विनंती अर्ज मागील वर्षाप्रमाणे उपरोक्त कारणास्तव नाकारण्यात यावा, असे नम्र आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.२० मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, प्रमुख उत्सव, स्थानिक उत्सव यांच्या पध्दती व नियम याबाबतच्या माहिती पुस्तिकेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत प्रति दिन श्रीसाईबाबांचे काकड आरती, मंगलस्नान, समाधी अभिषेक, शिर्डी माझे पंढरपुर आरती, माध्यान्ह आरती, धूपारती, शेजारती, तसेच प्रमुख उत्सव श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येतात. त्याचप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम, पूजा-अर्चा, प्रथा व परंपरेनुसार होणारे स्थानिक उत्सव, तसेच मंदिरातील इतर पूजा-अर्चा, प्रथेप्रमाणे पूजन, रथ, मिरवणूक, पालखी मिरवणूक, गुरुवारची नित्याची पालखी, ग्रहणकालावधी पूजन, कीर्तन कार्यक्रम तसेच समाधी मंदिर, गुरुस्थान, द्वारकामाई, चावडी, नंदादीप समकालीन भक्त समाधी, गणपती मंदिर, शनि मंदिर, महादेव मंदिर, हनुमान मंदिर, याठिकाणचे दैनंदिन पूजा-अर्चा व कार्यक्रम इत्यादीबाबतची माहिती संस्थानकडे लिखीत स्वरुपात एकत्रितरित्या उपलब्ध नव्हती.

त्याकरीता मा.श्री.किशोर मोरे साहेब, माजी कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षेतेखाली अशा प्रकारची माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. सदर माहिती ही श्रीसाईसच्चरित, पुजाऱ्यांचे अनुभव, अधिकारी वर्गाकडील माहिती इत्यादीचे आधारे तयार करण्यात आली असून संबंधीत माहिती संकलीत करुन ठेवणे आवश्यक आहे. भावी काळात देश-विदेशातील साईभक्तांसाठी संस्थानचे दैनंदिन कार्यक्रम, उत्सव व इतर माहिती एकत्रीतरित्या उपलब्ध होईल, या उद्देशाने सदर माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली होती. तसेच संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे कार्यक्रम यामध्ये एकसुत्रता व नियमावली तयार होईल. त्याचप्रमाणे सदर माहिती पुस्तक विविध भाषांमध्ये तयार करता येईल. याकामी सदर विषय मा.त्रिसदस्य समितीचे दि.२१.०६.२०१३ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. परंतु, निर्णय क्रमांक ५०९ नुसार या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले आहे.

भावी काळात सर्वांसाठी संस्थानचे दैनंदिन कार्यक्रम, उत्सव व इतर माहिती संस्थानसाठी व भक्तांसाठी एकत्रीतरित्या उपलब्ध व्हावी. तसेच संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे कार्यक्रम यामध्ये एकसुत्रता व नियमावली तयार व्हावी याकरीता नव्याने कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी (मंदिर), अधिक्षक, मंदिर विभाग तसेच मंदिरातील पुजारी यांचे मार्गदर्शनाखाली पुन्हा अद्यायावत माहिती पुस्तिका तयार करता येईल. तरी नव्याने माहिती पुस्तिका तयार करणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरामध्ये श्रींचे होणारे दैनंदिन कार्यक्रम, रुढी-परंपरेने चालत आलेले प्रमुख उत्सव, स्थानिक उत्सव यांच्या पध्दती व नियम याबाबतची माहिती पुस्तिका बनविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.२१** **श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची मागील वर्षाच्या मंजुर दराने विक्री करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त हे दर्शनासाठी आले नंतर आपल्या बरोबर आणलेले नारळ मंदीर परिसरातील नारळ स्टॉलच्या खोलीत नारळ अर्पण करत असे दिनांक ०२/११/२०१३ पासून संरक्षण विभागा मार्फत प्रवेश व्दार नं.०१, ०२, ०३, ०४ या ठिकाणाहून साईभक्त दर्शनासाठी आत दर्शन रांगेत येतांना त्यांची तपासणी करुन साईभक्तांकडील नारळ गेटवर काढले जातात. त्यानंतर साईभक्तांना दर्शन लाईन मध्ये सोडले जाते.

तसेच व्दारकामाई, मारुती मंदिर या ठिकाणी साईभक्त श्रीफळ अर्पण करतात. सदर नारळ आपण गोळा करुन साठवण करण्यात येते. व गरजे प्रमाणे प्रसादालयात बनविण्यात येणाऱ्या बर्फीसाठी व सत्यनारायण पुजेसाठी नारळ पोते देण्यात येतात.

दि. २१/०६/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय अन्वये दरपत्रके मागविण्यात आली. त्या अनुसरुन श्री इम्तीयाज रफिक पठाण दि. १३/०७/२०१३ रोजी सिलबंद दरपत्रक संस्थान कार्यालयात सादर केले होते. सदरचे दरपत्रक मा. कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष उघडण्यात आले. दरपत्रकात देऊ केलेले दर रु. ४२५ मात्र प्रती शेकडा (रु. ४.२५ मात्र प्रती नग) हा नारळ विक्री दर निश्चीत करण्यात आलेला आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.५९४ अन्वये (दर रु. ४.२५ प्रती नग) या दराने श्री इम्तीयाज रफिक पठाण मु. पो. कोपरगाव यांना दि. १७/०७/२०१३ ते दि. ३०/०६/२०१४ अखेर कालावधीसाठी नारळ विक्री करण्याचे टेंडर देण्यात आलेले आहे. दि.१९/०७/२०१३ ते दि.३०/०६/२०१४ अखेर ४,६२,४६० नग नारळ फळे विक्री करुन रु. १९,६५,४५५/- मात्र संस्थानला उत्पन्न मिळालेले आहे. सदरच्या टेंडरची मुदत दि.३०/०६/२०१४ अखेर संपलेली आहे.

जुलै २०१४ ते जुन २०१५ अखेर नारळ फळे विक्री करणे, विक्रीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यास निवीदा मागवून नारळ फळांची विक्री करणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सादर केला होता. त्यावर दि. ०५/०६/२०१४ रोजीच्या सभेत निर्णय क्र.४१६ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावीत कामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाणे सुचवील्या प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविण्यात आला. वर्तमान पत्रात जाहीरात देणे, दरपत्रक मागविणे, दरपत्रक उघडणे इ. प्रक्रियेला वेळ लागणार असल्याने ही प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत दररोज जमा होणारे नारळ खराब होवू नयेत म्हणून मागील वर्षीचे दरानुसार टेंडरधारकास किंवा अन्य व्यापाऱ्यास प्रती नारळ नग दर रु.४.२५/- या दरांने नारळ फळांची विक्री (जुलै २०१४ ते जुन २०१५ या दरपत्रकातील दरास मंजूरी मिळे पर्यत) करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **श्री साईप्रसादालय एच.टी. कन्झ्युमर नं.१६५१८९००६५४० चा विद्युतभार वाढवून घेणेकरीता महाराष्ट्र राज्य बील वितरण कंपनीकडे विद्युत चार्जेस भरणे व करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. या वीजपुरवठयाकरीता ४५० KW (४५० KVA) इतका वीजभार मंजूर आहे.

परंतू आता त्याठिकाणी साईटेक प्रोजेक्ट मशिनरी, R.O.Plant मशिनरी तसेच श्री साई प्रसादालयामधील चपाती तयार करण्याच्या मशिनरी इ.मशिनरींमध्ये वाढ झालेली असल्याने तसेच दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत असल्याने मशिनरी सतत कार्यान्वित असतात. या कारणाने प्रसादालयाचा एकुण वीजभार हा ४५० KW (४५० KVA) वरुन ५५० KW (५५०KVA) च्या आसपास गेलेला आहे. सदरील ठिकाणच्या वीज जोडणीचा वीजभार वाढवून घेणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने संस्थानला पत्र क्र.SE/ANRC/TECH/१५९३६ दि.२७-०८-२०१३ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

म.रा.वि.वि.कंपनीने पत्र क्र.SE/ANRC/TECH/०९४७८ दि.१०-०६-२०१४ नुसार वाढीव विद्युत भारापोटी सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम व इतर चार्जेस भरणेविषयी कळविलेले आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Description | Amount |
|---|---|---|
| A | 1.3 Supervision Charges | 1,834.00 |
| B | S.C. Charges | 290.00 |
| C | Additional Security Deposit | 10,46,085.00 |
| D | Cost of Agreement | 400.00 |
| E | Applications & Registration Fee | 1,700.00 |
| | **Total Amount :-** | **10,50,309.00** |

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रु.१०,५०,३०९/- इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

सबस्टेशनचा इलेक्ट्रीकल लोड वाढल्यामुळे सध्याच्या असलेल्या २५/ ५A च्या C.T. काढून त्याठिकाणी नविन जादा क्षमतेच्या (५०/ ५ A) च्या C.T. बसविणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कळविलेले असल्याने आपणास नविन ५०/ ५ A C.T. खरेदी करुन बसवाव्या लागणार आहेत. नविन C.T.बसविणेच्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Supplying, erecting, testing commissioning 11 KV H.T.3 CTS having C.T. ratio 50/5 Amp and tated output 10 VA for existing Metering Cubical (Without Meter) approved by MSEDCL | 03 | 17500/- | 52,500/- |
| 02) | Sundries Suchas Cable Trench, LA, Nutbolts, Washers, Jumper & Minor Fabrication | LS | 8000/- | 8,000/- |
| | | | Total Rs. | 60,500/- |

नविन जादा क्षमतेच्या (५०/ ५ A) C.T. बसविणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अंदाजपत्रकानुसार एकुण खर्च अंदाजे रक्कम रुपये ६०,५००/- इतका खर्च येणार आहे. सदरील C.T. विद्युत ठेकेदार/ उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसवाव्या लागणार आहेत.

तरी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रुपये १०,५०,३०९/- इतकी रक्कम सिक्युरिटी डिपॉझिट व इतर चार्जेस भरणे व नविन वाढीव क्षमतेच्या (५० / ५ A) C.T. विद्युत ठेकेदार/ उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये ६०,५००/- मात्र खर्चास असे दोन्ही मिळून एकुण रु.११,१०,८०९/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८६ सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन सुधारित प्रस्ताव तयार करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांना मोफत दुरध्वनी क्रमांक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात दि.०५/०७/२०१४ रोजी निवासस्थाना संबधित झालेल्या सभेत श्री साईबाबा संस्थान मंदिर व श्री साईंचे दर्शनासाठी येणारे साई भक्त यांचे सुरक्षेच्या दृष्टीने संस्थानला व साई भक्तांना संस्थान मंदिर परीसरातुन किंवा बाहेरगांवा वरुन पोलीस स्टेशनशी तातडीचे वेळेस त्वरीत संपर्क करणेसाठी शिर्डी पोलीस स्टेशन करीता टोल फ्री नंबर संस्थान खर्चाने बसवुन देण्यात यावा तसेच त्याचे येणारे वार्षिक बीले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी आदा करावे व त्याबाबतची कार्यवाही त्वरीत सुरु करावी असे आदेश मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी दिलेले आहेत. तसेच मा.प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांनीही दि.०७/०७/२०१४ रोजी शिर्डी पोलीस स्टेशनकरीता

बीएसएनएल यांचे कडुन एक टोल फ्री नंबर घेऊन पोलीस स्टेशन येथे कार्यान्वित करुन देणे व त्यासाठी येणारा सर्व खर्च व नंतरचे येणारे वार्षिक टेलीफोन बीले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत आदा करणेत यावी असे निर्देश दिलेले आहेत.तसेच दि.०८/०७/२०१४ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी फोन त्वरीत बसवुन देण्यात यावा व खर्चाची मा.राज्य शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी असे सांगीतले आहे.

**अ)** उपरोक्त प्रमाणे टोल फ्री नंबर घेणेसाठी शिर्डी बीएसएनएल कार्यालयाकडुन पोलीस स्टेशन करीता सुरवातीस एक लँडलाईन नंबर करीता रुपये ५००/- डिपॉझीट+ टॅक्स+ ॲक्टिवेशन चार्जेस मिळुन अंदाजे रुपये १०००/- भरावे लागणार आहे.लँडलाईन नंबर चालु केलेनंतर टोल फ्री नंबरसाठी रुपये १०,०००/- डिपॉझीट भरावे लागणार आहे. डिपॉझीट भरल्यानंतर टोल फ्री नंबर कार्यान्वित करण्यात येईल. या करीता अंदाजे एकुण रक्कम रुपये ११,०००/- मात्र खर्च येणार आहे.

**ब)** टोल फ्री नंबर चालु केले नंतर सुरवातीच्या येणाऱ्या बीलामध्ये रु.१२,०००/- टोल फ्री नंबरचे वार्षीक भाडे+ रु.३०००/- ॲक्टिवेशन चार्जेस+रु.१८५४/- सर्व्हिस टॅक्स असे एकुण रुपये १६,८५४/- मात्र बील येणार आहे.

**क)** पहीले वर्षाचे टोल फ्री नंबरचे बील भरल्यानंतर पुढील दर वर्षाकरीता टोल फ्री भाडे रु.१२,०००/- +सर्व्हिस टॅक्स रु.१४८३/- असे एकुण रुपये १३,४८३/- खर्च टोल फ्री नंबरसाठी येणार असुन भविष्यात या वार्षिक बीला मध्ये बीएसएनएल यांचेकडुन वाढही होऊ शकते.

**ड)** सदरचा टोल फ्री नंबर हा कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नांवाने घ्यावा लागेल. लँड लाईन व टोल फ्री नंबरसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे (फोटो आयडी, पासपोर्ट फोटो) हे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे दयावे लागेल. तसेच इतर पुरावा म्हणुन संस्थानचे लाईट/दुरध्वनी बील देता येईल. लँड लाईन व टोल फ्री नंबरसाठी ठेवण्यात येणारे रुपये १०,५००/- डिपॉझीट हे कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नांवाने जमा करण्यात येईल. बीएसएनएल शिर्डी यांना टोल फ्री नंबर घेणेसाठी आवश्यक असणाऱ्या कागद पत्रांची पुर्तता करणेसाठी पोलीस स्टेशनचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत शिर्डी पोलीस स्टेशन येथे टोल फ्री नंबर बसविणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

तरी उपरोक्त अ, ब, क, ड प्रमाणे रु.१०००/- लँड लाईन फोनसाठी, रु.१०,०००/- टोल फ्री नंबर घेणेसाठी डिपॉझीट,सुरवातीचे येणारे बील रु.१६,८५४/- भरणेसाठी तसेच पुढील दरवर्षीचे येणारे टोल फ्री नंबरचे बील रुपये १३,४८३/- असे अंदाजे एकुण रक्कम रुपये ४१,३३७/- मात्रचे खर्चास व पुढील येणारे टोल फ्री नंबरचे दुरध्वनी बील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मार्फत बीएसएनएल यांना आदा करणेसाठी मान्यता असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे अ, ब, क, ड मध्ये नमुद केल्याप्रमाणे शिर्डी पोलीस स्टेशन करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत टोल फ्री नंबर बसविणेसाठी येणाऱ्या सर्व खर्चास व पुढील येणारे सर्व टेलीफोन बीले ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत बीएसएनएल यांना आदा करणेसाठी मा.त्रीसदस्यीय समितीची तसेच या खर्चास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४ श्री समाधी मंदिर व दर्शन हॉल वातानुकूलित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांनी दि. १२-१०-२०१३ रोजी पत्राव्दारे संपुर्ण समाधी मंदिर व दर्शन लाईन वातानुकूलित करण्याचे काम देणगी स्वरुपात करणेची ईच्छा प्रदर्शित केलेली होती. साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांनी शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी ए.सी. यंत्रणा देणगी स्वरुपात बसवुन देण्याची व त्यानंतर पुढील पाच वर्ष संपुर्ण यंत्रणेची दुरुस्ती खर्च मोफ़त करणार असल्याचे कळविलेले होते.

देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचे पत्रानुसार शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेकरीता मा. त्रिसदस्य समिती यांचे दि. २७-१०-२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र. १५ निर्णय क्र. ८६८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांना दि. १४-११-२०१३ तसेच दिनांक २३-११-२०१३ रोजी पत्र पाठवुन शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेची कार्यवाही त्वरीत करणेविषयी काळविण्यात आलेले होते. श्री चुनिलाल खन्ना, मुंबई यांना पत्र पाठवुन सहा महिनेपेक्षा जास्त कालवधी झालेला असुन वारंवार दुरध्वनीवरुन संपर्क साधुनही श्री चुनिलाल खन्ना, मुंबई यांचेकडुन अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही अथवा कोणताही पत्र व्यवहार झालेला नाही.

तसेच दि. २६ जुन २०१४ रोजी देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांना नोटीस पत्र पाठवुन नोटीस सात दिवसाच्या आत लेखी खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले होते. सदरचे पत्र श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांना ३० जुन २०१४ रोजी भेटल्याचे विद्युत विभाग़ास दि. ०८ जुलै २०१४ रोजी प्राप्त झालेल्या पोहच पावतीवरुन लक्षात येत आहे.

परंतु आजपावेतो साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचेकडुन कोणतेही उत्तर अथवा लेखी खुलासा प्राप्त झालेला नसल्याने शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचेकडुन देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेकरीता मा.त्रिसदस्य समितीचे दि.२७-१०-२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र १५ निर्णय क्र.८६८ अन्वये झालेला ठराव रद्द करण्यात यावा, असे वाटते.

दरम्यानच्या काळात साईभक्त श्री. गुप्ता (श्री. मुकेश मोहन), नवि दिल्ली यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची भेट घेऊन तसेच दिनांक २९ जुन २०१४ रोजी पत्र पाठवुन श्री चुनिलाल खन्ना, मुंबई यांचेऐवजी शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेची इच्छा व्यक्त केलेली आहे. तरी देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचेऐवजी साईभक्त श्री. गुप्ता (श्री.मुकेश मोहन), नवि दिल्ली यांचेकडून शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेस मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री. गुप्ता (श्री.मुकेश मोहन), नवि दिल्ली यांचेकडून शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, श्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसवून घेणेस मान्यता देण्यात आली.**

**बांधकाम विभागाने याकामी काही तांत्रिक अडचणी येऊ शकतात काय, याविषयी विषद करावे व देणगीदार यांनीही तज्ञांकडून तांत्रिक बाबी तपासून घ्याव्यात. सदरहू यंत्रणा उच्च दर्जाची, अत्याधुनीक पध्दतीची व नामांकित कंपनीची असावी. या यंत्रणेच्या मशिनरीपासून मंदिरापर्यंत नेण्यात येणारे डक्ट नवीन पध्दतीचे हाय व्हेलॉसिटीचे/ हाय प्रेशर विथ मिनी साईज अशा प्रकारचे बसविण्यात यावे. तसेच, सदरहू यंत्रणा बसविताना मंदिराच्या वास्तूस किंवा सौदर्याला कोणतीही बाधा येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, याबाबत देणगीदार साईभक्तास कळविणेत यावे. त्यानंतर जर देणगीदार साईभक्तानी अनुकूलता दर्शविली तरच त्यांना देणगीदाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेस परवानगी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा संस्थान, शिर्डी करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन प्रस्तावित योजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आला असून तो ६.६० MLD हया क्षमतेचा आहे. तसेच पाईपलाईन्स हया २२ वर्ष जुन्या झालेल्या आहेत. सध्या संस्थान परिसरातील इमारतींना कनकुरी येथील साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टॅंक, नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती, रुग्णालये, श्री साईप्रसादालय व साईधर्मशाळा इ. करीता पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी ही कालबाहय झालेली असून सदरच्या पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करावयाचा

झाल्यास सदरची पाईपलाईन लिकेज होवून संपुर्ण संस्थान परिसराचा पाणी पुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे.

तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्धी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि.१९/१०/२०१८ या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. त्यावेळी श्रींचे दर्शनाकरीता येणारे भक्तांमध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. त्यावेळी साईभक्तांना पुरेशा प्रमाणात शुध्द पाण्याचा पूरवठा करणे गरजेचे आहे.

वरील बाबी विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत उपरोक्त वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम तातडीने सुरु होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गावे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे. या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी इतकी आहे. त्यापैकी योजनेतील २ गावांसाठीची किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु. २१५.९७ - १९.०४ = रु. १९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदरहूकामी संस्थानसाठी रु. १९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

तसेच सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्‌भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वतः मान्यता प्राप्त आहे. पाटबंधारे खात्याच्या दि. १०/०४/२०१३ च्या पत्रान्वये रु.१८३.९३ कोटी खर्चाचा हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आले आहे. सदर अंशदानाच्या रकमेचा समावेश योजनेच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला नाही.

वरीलनमुद केलेप्रमाणे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पूर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबवावयाची झाल्यास कनकुरी व पिंपळवाडी या दोन गावांसाठीची किंमत वगळता संस्थानसाठी रु. १९६.९३ कोटी मात्र इतका हिस्सा येतो. तसेच लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविल्यानुसार प्रकल्प खर्चाचा प्रमाणशीर वाटा रु. १८३.९३ कोटी खर्च संस्थानने उचलणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु. १९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशीर वाटा रु. १८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु. ३८०.८६ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती सभेत धोरणात्मक निर्णयसाठी सादर केलेला आहे.

**ब)** मा.मंत्री कृषी व पणन महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई मा.ना. राधाकृष्ण ए. विखे पाटील यांनी, पाणी पुरवठा योजनेबाबत मा.श्री.अनिल कवडे, सदस्य श्री साईबाबा संस्थान, शिर्डी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना अग्रेषीत केले ले पत्राची प्रत दि.२५.०६.२०१४ रोजी इकडिल कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

मा.मंत्री महोदय यांनी कळविले आहे की, शिर्डी करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर योजना संस्थानमार्फत ठेव स्वरुपात रक्कम जमा करुन राबविण्यात यावी असे जीवन प्राधिकरण विभागाने सुचविले आहे.

तथापी केवळ संस्थानकरीताच स्वतंत्र व थेट पाईप लाईन करणे योग्य होणार नाही. तसेच योजनेचा संपूर्ण खर्च सुध्दा संस्थानमार्फत करणे उचित वाटत नाही. याच योजनेत शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, कोऱ्हाळे, डोऱ्हाळे, वाळकी, नांदुर्खी बु., नांदुर्खी खुर्द, कनकुरी व पिंपळवाडी या कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश केल्यास केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून योजनेसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे संस्थानवरील खर्चाचा बोजा कमी होईल.

उपरोक्त सर्व गावांकरीता यापूर्वीच स्वतंत्र साठवण तलाव, उंच जलकुंभ व वितरण व्यवस्था तयार करण्यात आलेल्या आहेत. फक्त मुख्य पाईप लाईन नव्याने करुन त्याद्वारे अस्तित्वातील साठवण तलावात पाणी सोडण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

या योजेनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने संस्थान व शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांबरोबरच साई भक्तांनाही याचा लाभ होणार असल्याने, सदरच्या योनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा. योजनेसाठी स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत व आवश्यक लोकवर्गणी संस्थानमार्फत उपलबध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी. अशी विनंती केली आहे.

**विभागाचे मत- अ)** प्रमाणे कार्यवाही सुरु आहे. याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ मधील पोट कलम (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदी नुसार मा.त्रिदस्य समितीची मान्यता घेतल्यानंतर उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सिव्हील अॅप्लीकेशन मा.कोर्टात सादर करुन मान्यता घेऊन पाणी पुरवठा योजनेसाठी खर्च करता येईल असे मतआहे.

**ब)** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ साजरा होणार आहे. तत्पुर्वी कार्यवाही होणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम (शिर्डी) २००४ मधील तरतूद कलम २१ (२) पोट कलम (१) नुसार मा.त्रिसदस्य समिती, छाननी समिती, उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेतल्यानंतर पाणी पुरवठा योजनेसाठी खर्च करता येईल असे मत आहे. सदरहू प्रस्तावावर मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.५८९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन आणणेच्या योजेनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साई भक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्यामुळे सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेऊन स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी संस्थानमार्फत उपलबध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितबाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२६** **संस्थान वापरासाठी निळवंडे धरणातून पाणी आरक्षण ठेवणेपोटी संस्थान निधीतून रु.५०० कोटी निधी शासनास उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.४ अन्वये संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १० % रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा.मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे. तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणातून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सन्मा.नामदार प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना मा.अध्यक्ष यांनी दि.०१/०३/२०११ चे पत्राव्दारे विनंती वजा प्रस्ताव सादर केला आहे. तद्नंतर दिनांक १२/०६/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४१ अन्वये संस्थानसह कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव-को-हाळे या गावांसह वाढीव पाणी पुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणे संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा व त्याची प्रत मा.जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी देण्यात यावी असे ठरले.

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्रं./ तांशा/ १७५०/ २०११, दिनांक १७/०९/२०११ चे पत्रान्वये कळविले आहे की, अहमदनगर जिल्हयातील शिर्डी व राहाता मतदार संघातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरु असलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांची आढावा बैठक मा.मंत्री, कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली दि.८/८/२०११ रोजी मंत्रालयात संपन्न झाली. बैठकीच्या प्राप्त झालेल्या इतिवृत्तानुसार निळवंडे धरण उद्भव घेवून नविन शिर्डी देवस्थान पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर योजनेचे सर्वेक्षण व त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत तयार करावयाचे असल्याने त्याकामी २ % Preparation Charges च्या against महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुरुवातीस कमीत कमी रु.१५.० लक्ष इतका निधी त्वरीत वर्ग करणेत यावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असे कळविले आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ०४, दि. १३/०२/२०११ अन्वये संस्थानसाठी स्वयंचलित पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत राबविणेचे ठरले असून त्यानुसार सदर योजनेबाबत कार्यवाही जीवन प्राधिकरणार्माफत सुरु आहे. सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण, प्लॅन व एस्टिमेट तयार करणे कामासाठी संस्थानतर्फे मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.१० लाख मात्र इतका निधी दि. २३/११/२०११ रोजी धनाकर्षाव्दारे उपलब्ध करणेत आलेला आहे.

**संदर्भ क्रं.१** अन्वये मा.मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्रात शिर्डी परिसर निळवंडे धरणांपेक्षा भौगोलिकदृष्टया खालच्या बाजूस असल्याने पाणी पुरवठयासाठी विजेचा खर्च लागणार नाही. तसेच निळवंडे धरणाचा उद्‌भव असल्याने साठवण तलावाच्या भुसंपादनासाठी बांधकामासाठी मोठया प्रमाणावर येणारा खर्च वाचणार आहे. निळवडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानचे डाव्या कालव्याच्या कामांसाठी पाचशे कोटी निधी शासनास उपलब्ध करुन दिल्यास कालव्याचे काम जलद गतीने पुर्ण होवू शकेल व निळवंडे कालव्याची कामे पुर्ण झाल्यास कालव्याव्दारे पाणी पुरवठा झाल्याने बाजूच्या गावांतील भूजल पातळीत वाढ होवून विहीरींना पाणी उपलब्ध राहू शकेल. यामुळे शिर्डी शहरावरील पाण्याचा ताण कमी होऊ शकणार आहे. सदरचा प्रस्ताव शिर्डी शहर, श्री साई संस्थान परिसराच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या या प्रकल्पाबाबत विचार विनिमय करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांचे उपस्थितीत सर्व संबंधीतांची तातडीने बैठक आयोजित करणेबाबत विनंती केलेली आहे.

**संदर्भ क्रं.०२,** महाराष्ट्र शासन, पत्र क्रं. सासवि-२०१२/सं.क्र.४९२/सोळा,विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचे दिनांक ५ नोव्हेंबर,२०१२ चे पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मा. श्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्रात नमुद केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने श्री साईबाबा संस्थानचे अभिप्राय पाठविण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत अद्याप निर्णय झालेला नसल्याने मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांना संस्थान अभिप्राय देण्यात आलेला नाही.

**संदर्भ क्रं.३,** अन्वये मा.मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी निळवंडे धरणाच्या कामांसाठी आवश्यक सुमारे १२०० कोटी रुपयापैकी ५०० कोटी रुपये संस्थानने उपलब्ध करुन दिल्यास दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा प्राप्त होण्याबरोबरच संस्थानला कायमस्वरुपी शाश्वत पाणी पुरवठा होऊ शकणार आहे. तरी संस्थानसाठी निळवंडे धरणांतून पाईपलाईन करण्यापुर्वी कालव्यांच्या कामांसाठी संस्थानकडुन ५०० कोटी रुपये निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

तरी याबाबत योग्य तो आदेश होणेसाठी सदरचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.५९०** **उपरोक्त प्रस्तावावर साधक-बाधक व प्रदीर्घ चर्चा होणे आवश्यक असल्याने, सदरहू विषय तहकूब करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **साईटेक प्रकल्पांतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर- २०१३ ते फेब्रुवारी- २०१४ अखेरची बीले आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचे ठराव क्रं.**– मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७७९.

**प्रस्ताविक**: माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही. रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना उपरोक्त संदर्भ क्र१ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे.करारनाम्यातील अटी शर्तीनुसार पहिल्या टप्प्यातील संगणक प्रणाली मान्य झालेनंतरकॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रत्येक महिन्याचे येणारे मासिक बील संस्थानने त्यांना अदा करावे लागणार आहे.दि. २९/१०/२०११ रोजीचे आयटी कमिटीचे बैठकीतील निर्णयानुसार पहिल्या टप्प्यातील संगणक प्रणाली ०१ ऑगष्ट २०११ पासून मान्य करण्यात आलेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. २६/११/२०११ रोजीचे मंजूर टिपनी अन्वये त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे नोव्हेंबर २०१३ अखेरची बीले त्यांना अदा करण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीची दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेमध्ये साईटेक प्रकल्प सल्लागार समिती,

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे प्रतिनीधी यांचे उपस्थितीत प्रकल्पाचा अढावा घेण्यात आला. प्रकल्पाचे सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा झालेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांना आतापर्यंत दिलेल्या सर्व कार्यप्रणालीतील सर्व अडचणींचे माहे एप्रिल २०१४ अखेर समाधानकारक निरसण करावे, असे निर्देश देण्यात आलेले होते.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी आतापर्यंत सर्व कार्यप्रणाली संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. यातील काही संगणक कार्यप्रणाली यापुर्वीच संबधीत विभागाने वापण्यास सुरुवात केलेली आहे. कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी किंवा आवश्यक बदल वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविण्यात आलेले आहेत. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्राधान्यक्रमाने सदरच्या अडचणी सोडविलेल्या आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविण्यात आलेल्या काही अडचणी/बदल अद्याप सोडविणे बाकी आहे, परंतु सदर बाबीमुळे कार्यप्रणाली वापरण्यास कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही. सबब सद्दस्थितीत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली (लाडूप्रसाद वगळता) वापरण्यायोग्य झालेल्या आहेत. तथापि कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी तसेच कार्यप्रणाली अधिक परिणामकारक/सुटसुटीत होण्यासाठी करावे लागणारे आवश्यक बदल करुन देण्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मान्य केलेले आहे. अकाऊंट विभागाचे कार्यप्रणालीमध्ये सद्दस्थितीत अकाऊंट विभागाचे सर्व व्यवहारांची नोंद होत आहे. कार्यप्रणालीमध्ये अपेक्षित सर्व दैनंदिन रिपोर्ट उपलब्ध आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व मा.श्री.के.व्ही. रमणी सो. यांनी अकाऊंट विभागात सध्या वापरात असलेली टॅली ही कार्यप्रणाली पुर्णपणे बंद करुन नविन कार्यप्रणालीचा वापर सुरु करणेस हरकत नसल्याचे कळविलेले आहे.कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी त्वरीत सोडविण्याची कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी ग्वाही दिलेलीआहे.

दि. २१/०५/२०१४ रोजी साईटेक प्रकल्प साप्ताहिक आढावा मिटींगमध्ये (कॉफ्रस कॉल)कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर २०१३ ते एप्रिल २०१४ पर्यंतचे बीलाबाबत चर्चा झाली असता, माहे डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ पर्यंतचे बीले कॉग्नीझंट यांना अदा करण्यात यावीत, तसेच मार्च व एप्रिल चे बीले कार्यप्रणालीसंदर्भातील सर्व कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून ३०/०५/२०१४ अखेर पुर्ण झालेंनतर देण्यात यावे, असे निर्देश मा.श्री.के.व्ही. रमणी यांनी दिलेले आहेत.

सद्यपरिस्थितीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली संबधीत विभागात कार्यान्वीत करुन देण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्षात कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी तथा आवश्यक आवश्यक बदल याबाबतची कार्यवाही आयटी विभागामार्फत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून करून घेण्यात येत आहे. कार्यप्रणालीमध्ये आवश्यक असलेल्या सुधारणांपैकी काही सुधारणा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून करणे बाकी आहे. सदरच्या सुधारणा तसेच भविष्यात कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी / त्रुटी, करारनाम्यामध्ये **(8.0 Support and Warranty Page No. 51-52)** नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसारकॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सोडवून घेता येतील व त्यानसार त्यांचे पुढील बीले अदा करता येतील.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी, त्यांची डिसेंबर २०१३ पासूनचे बीले दि. २०/०६/२०१४ पर्यंत अदा झाली नाही तर कार्यप्रणाली संदर्भातील कार्यवाही तसेच सपोर्ट कंपनीमार्फत थांबविण्यात येईल, असे दि. १६/०६/२०१४ रोजीचे पत्राद्वारे कळविलेले आहे.

**मागणी**: कार्यप्रणालीमध्ये आवश्यक असलेल्या सुधारणांपैकी काही सुधारणा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून करणे बाकी आहे. सदरच्या सुधारणा तसेच भविष्यात कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या अडचणी / त्रुटी, करारनाम्यामध्ये (8.0 Support and Warranty Page No. 51-52) नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसारकॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सोडवून घेता येतील व त्यानसार त्यांचे पुढील बीले अदा करता येतील.

दि.२१/०५/२०१४ रोजी साईटेक प्रकल्प साप्ताहिक आढावा मिटींगमध्ये (कॉफ्रस कॉल) दिलेल्या निर्देशाप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ पर्यंतचे मासिक बीले त्यांना अदा करावी व माहे मार्च व एप्रिल २०१४ ची बीले, दि. २४/०६/२०१४ रोजी मा.कार्यकारी सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सर्व कार्यप्रणालीतील त्रुटींचे निरसन केलेनंतर अदा करावी, असे नम्र मत आहे.

माहे डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ च्या बीलांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| Month | Invoice No & Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| December 2013 | IN214-0000002654 | Service rendered for the month of December 2013 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | Total Amount | 27,78,370.04 |
| January 2014 | IN214-0000002695 | Service rendered for the month of January 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | Total Amount | 27,78,370.04 |
| February 2014 | IN214-0000002786 | Service rendered for the month of February 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | Total Amount | 27,78,370.04 |
| | | Grand Total | 83,35,110.12 |

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाणनी, शासन निर्देश,तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाणनी करुन अनुमान : अर्थिक

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मतः कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची माहे डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ पर्यंतच्या बीलाची रक्कम रु.८३,३५,११०.१२ रु (अक्षरी रक्क्म रु. त्र्यायंशी लाख पस्तीस हजार एकशे दहा मात्र) संस्थान नियमानुसार मंजुर होऊन, त्यांना चेक / डीडी / ऑनलाईन सेवेद्वारे लेखाशाखा विभागामार्फत अदा करणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पांतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर-२०१३ ते फेब्रुवारी- २०१४ अखेरच्या एकत्रित रु.८३,३५,११०/- मात्र बीलाच्या रकमेमधून ७५% रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली व उर्वरित २५% रक्कम सर्व विभागातील प्रणाली पुर्णपणे कार्यान्वित झालेनंतर त्यांना आदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **प्रसादालय विभागासाठी वापरण्यात आलेले रिकामे तेला-तुपाचे डबे खर्ची टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजन पुरविले जाते. दररोज अंदाजे ३८ हजार ते ४० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात व गर्दीमध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या वाढून ६० ते ६५ हजारापर्यंत जाते. या सर्व भक्तांना जेवणामध्ये चपाती, पुरी, भाजी, दाळ, भात, बर्फी, इ. पदार्थ दिले जातात. हे सर्व पदार्थ बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल मुख्य भांडार विभागातून आणला जातो ज्यामध्ये गहू, तांदूळ, हरबरा दाळ, कडधान्य तसेच वनस्पती तुप व लाडू बनविण्यासाठी गावरान तुप व काजूची मुख्य भांडार विभागातून मागणी करण्यात येते. वनस्पती तुप, गावरान तुप व काजू हे १५ किलो क्षमतेच्या पत्र्याच्या डब्यांमध्ये येत असते. सदर माल वापरल्यानंतर रिकामे झालेले वनस्पती तुप, गावरान तुप व काजूचे डबे अभिलेख कक्षाव्दारे उच्चतम दराने विक्री केले जातात.

प्रसादालयामध्ये एकुण ०६ गिरण्या असून त्या ७ ते ३ व ३ ते ११ या दोन्ही शिफ्टमध्ये चालू असतात. तसेच गर्दीच्या वेळी रात्र पाळीमध्ये सुद्धा सदर गिरण्या कार्यरत ठेवाव्या लागतात. त्यामुळे सदर पिठाच्या गिरण्यांचे जाते वरचेवर उतरतात त्यामुळे त्या जाते टाकण्यसाठी खोलाव्या लागतात व सदर गिरण्यांचे जाते टाकल्यानंतर त्या पुन्हा आहे त्याच स्थितीत बसवाव्या लागतात. सदर गिरण्या बसवते वेळी त्यांना पत्र्याची पॅकींग द्यावी लागते ज्यामूळे जात्यांची फिटींग योग्य राहून सदर गिरण्या व्यवस्थितपणे चालतात. सरासरी दररोज एका गिरणीचे जाते टाकले जाते त्यासाठी महिन्याकाठी तेला- तुपाचे रिकामे अंदाजे ५ डबे वापरले जातात.

तसेच प्रसादालय परिसरातील साफसफाई केल्यानंतर निघणारा कचरा भरणेकामी देखील डब्यांचा वापर होत असतो. त्याकामी महिन्याकाठी अंदाजे १५ डबे वापरले जातात. त्यामुळे दोन्ही मिळून महिन्याकाठी अंदाजे २० रिकामे डबे प्रसादालयासाठी वापरले जातात. प्रसादालयामध्ये वापरलेले रिकामे तेला-तुपाचे व काजूचे डबे अद्यापपर्यंत खर्ची टाकण्यात आलेले नाही.

माहे जाने-२००८ ते मार्च-२०१४ अखेर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खराब रिकामे तेला-तुपाचे डबे वापरलेले असून त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. नं. | वर्ष | तपशिल | प्रती महिना डबे संख्या | वार्षिक संख्या | दर रु. पै. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २००८-२००९ | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | २४.०० | ५७६०.०० |
| २. | सन २००९-२०१० | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | ३०.०० | ७२००.०० |
| ३. | सन २०१०-२०११ | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | २२.०० | ५२८०.०० |
| ४. | सन २०११-२०१२ | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | २२.५० | ५४००.०० |
| ५. | सन २०१२-२०१३ | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | २६.५० | ६३६०.०० |
| ६. | सन २०१३-२०१४ | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | २४० | २६.५० | ६३६०.०० |
| ७. | माहे जाने-२०१४ ते मार्च-२०१४ अखेर | रिकामे तेला-तुपाचे तोंड फुटलेले डबे | २० | ६० | २४.५० | १४७०.०० |

तरी माहे जानेवारी-२००८ पासून ते मार्च-२०१४ अखेर (प्रसादालय नवीन जागेत स्थलांतरीत झालेपासून) वरील कामाकरीता वापरण्यात आलेले खराब रिकामे तेला- तुपाचे १५०० डबे प्रसादालय खाती खर्ची टाकणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३७८३०/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तेला-तुपाचे एकूण डबे, रिकामे झालेले डबे व रिकामे डबे कुठे वापरण्यात आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा.**

**तसेच, यासाठी साईटेक प्रकल्पांतर्गत अद्ययावत प्रणाली विकसीत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९ पुर्णब्रम्हा, वसई यांचे तासी ६००० क्षमतेचे चपाती मशिन खरेदी करणेस अथवा देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१(१)(घ) नुसार भक्तांना जेवण देणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक:-** श्री साईप्रसादालयात दिवसेदिवस भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे सर्वच भक्तांना प्रसाद भोजनामध्ये चपाती पुरविणे शक्य होत नाही. त्यामुळे काही भक्तांना पुरी द्यावी लागते. पुरीबद्दल भक्तांच्या नेहमीच तक्रारी असतात. सध्या प्रसादालयात तासी २००० क्षमतेचे पाच मशिन कार्यान्वित आहे. परंतु सदरचे मशिनद्वारे आवश्यक चपातीचा पुरवठा होत नाही. सध्याचे कार्यान्वित असलेले सनशाईन इंडस्ट्रीजचे, नोएडा मशिनचे डिझाईन श्री राजू सोमन यांनी केलेले आहे.

पुर्णब्रम्हा, मुंबई द्वारा श्री राजु सोमन यांनी दिनांक २१.४.२०१४ रोजीचे पत्राने नविन मशिन कार्यान्वित केलेचे कळविलेले होते. त्यानुसार दिनांक ३१.५.२०१४ रोजी मा. उपकार्यकारी यांचे समावेत पुर्णब्रम्हा फुडस्, वसई, मुंबई यांनी विकसीत केलेले चपाती मशिनची पाहणी करणेत आलेली आहे. श्री राजु सोमन यांना चपाती मशिन बद्दलचा आत्तापर्यंचा अनुभवानुसार चपाती साठी लागणाऱ्या आवश्यक उष्णता व टाईम यांची योग्य ताळमेळ घेऊन मशिन तयार केलेले आहे. सध्या तयार केलेले मशिन हे अल्युमिनिअम स्क्वेअर बार पासुन बनविलेले आहे. मशिनची कन्व्हेअर सिस्टीम ही कप्याकप्यानी तयार केलेली आहेत. तसेच मशिनला बसविण्यात आलेले बर्नर, इलेक्ट्रीकल इक्युपमेंट हे ओपन आहे. तसेच प्रती तासास १००० चपाती बनविण्यात येते. सदरचे ॲटोमॅटीक चपाती मशिन हे न्युमॅटीक असुन त्यास कोठेही लुब्रीकंटचा वापर करणेत आलेला नाही. सदर न्युमॅटीक मॅकेनिझमद्वारे चपाती प्रेसींग व चपाती पलटी करणेत येते. तसेच चपाती पलटी होत असल्यामुळे चपाती दोन्ही बाजुने चांगल्या प्रकारे भाजली जाते. तसेच चपाती अंतिम स्टेजला भाजनेपुर्वी त्यातील वाफ प्रेस करुन काढणेत येते व त्यानंतर चपाती भाजून बाहेर पडते. त्यामुळे चपाती एकावर एक साठवून ठेवलेनंतर एकमेकांना चिटकत नाही. सदर मशिनवर तयार होणारी चपाती उत्कृष्ट आहे. सदर मशिनवर उत्पादक यांनी एकच ऑपरेटर आवश्यकता असल्याचे सांगितले परंतु प्रत्यक्ष बघितलेनंतर एका मशिनवर तीन ते चार ऑपरेटर्सची आवश्यकता लागणार आहे.

**मागणी:-** श्री साईप्रसादालयात दररोज ४० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. सर्व साईभक्तांना पुरी ऐवजी चपाती देणेकामी जास्त क्षमतेच्या ॲटोमॅटीक चपाती मशिनची आवश्यकता आहे. मशिनची क्षमता व चपाती गुणवत्ता दोन्हीचा विचार करुन नविन मशिन खरेदी करावे लागणार आहे. सध्या साईप्रसादालयातील चपाती मशिनच्या चपाती पेक्षा पुर्णब्रम्हा, मुंबई यांनी विकसीत केलेल्या चपाती मशिनची चपाती चांगली आहे. परंतु तासी १००० चपातीची क्षमता असलेले मशिन आहे. त्यामुळे

प्रसादालयातील चपातीची आवश्यकता लक्षात घेता त्यांना किमान तासी ६००० चपाती देणारे मशिन देऊ शकता का? अशी विचारणा करण्यात आली. त्यानुसार त्यांनी तासी ६००० चपाती बनविणारे मशिन तयार करणेचे कळविलेले असून त्याबाबत संदर्भिय अ. नं. ५ नुसार दरपत्रक सादर केलेले आहे. दरपत्रकानुसार त्यांनी एका मशिनसाठी रक्कम रु. ७८,००,०००/- + टॅक्स (अक्षरी रुपये अठ्याहत्तर लाख + टॅक्स) कळविलेले आहे.

श्री चे सन २०१८ पुण्यतिथी शताब्दी वर्ष असल्याने या वर्षी साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात राहणार आहे. त्यादृष्टीने साईभक्तांच्या देणेत येणाऱ्या सेवेमध्ये प्रसादभोजनात पुरी ऐवजी चपाती देणे आवश्यक आहे. साईप्रसादालयामार्फत साईआश्रम भाग १ , नविन भक्त निवासस्थान व द्वारावती येथे प्रसाद भोजन देणेत येते. त्यामुळे भविष्यात चपातीची आवश्यकता लक्षात घेता नविन मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु एकाच वेळेत जास्त मशिन खरेदी न करता पुर्णब्रम्हा, मुंबई यांचेकडून तासी ६००० क्षमतेचे चपाती मशिन खरेदी करण्यात यावे व त्यानंतर मशिनची क्षमता व तयार होणाऱ्या चपातीची गुणवत्ता तपासून आवश्यकते नुसार मशिन खरेदी करता येतील.

पुर्णब्रम्हा, वसई यांचे मशिन खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा विषय हायकोर्ट (औरंगाबाद खंडपीठ) यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल. पुर्णब्रम्हा, वसई यांचे मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये श्री राजेंद्र सोमण यांना बोलविता येईल व त्यांचे बरोबर चर्चा व वाटाघाटीद्वारे निर्णय घेता येईल. याकामी श्री साईप्रसादलयात सन २०१४-१५ या अंदाजपत्रकात नविन मशिनरी खरेदीकामी रक्कम रु. १,५०,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमानः-** तांत्रिक/ अर्थिक

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः-** पुर्णब्रम्हा, वसई यांचे तासी ६००० क्षमतेचे चपाती मशिन खरेदीकामी श्री राजु सोमण यांना मा. व्यवस्थापन समिती समोर चर्चा व वाटाघाटीस बोलावून निर्णय घेणेस अथवा सदरचे मशिन देणगीदार साईभक्तामार्फत देणगी स्वरुपात स्किारणेस मान्यता मिळणेकरीता निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरिता खरेदी करावयाचे पुर्णब्रम्हा, वसई यांचे उत्पादित तासी ६००० क्षमतेचे चपाती मशिन संस्थानमार्फत खरेदी न करता, देणगीदार साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळत असेल तर स्विकारणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.३०** **लाडू प्रसाद विक्रीसाठी कुपन बुके छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ मधील महाराष्ट्र शासन विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित विनियम मधील १७ (१) मधे भक्तगणांना आवशक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

दि.१५ ऑगस्ट २०१३ पासून दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.ज्या साईभक्तांना जादा लाडू प्रसाद पाकींटाची आवशकता आहे.अशा साईभक्तांसाठी लाडू विक्री काऊंटरवर ३ लाडूचे एक पाकीट रु. २०/- प्रतिनग या दरांप्रमाणे विक्री करण्यात येत आहे.लाडू निर्मिती विभागाकडून ३ चे एक पाकीट याप्रमणे एका कॅरेट मधे १०० पाकीटे भरण्यात येतात व भरलेली कॅरेटस् विक्रीसाठी कॅन्टीन विभागाकडें देण्यात येतात.कॅन्टीन विभागाकडे लाडू निर्मिती विभागाकडून किती कॅरेटस् (पाकीट) मिळालीत याची नोंद घेण्यात येते व विक्री करण्यात आलेल्या लाडू प्रसाद पाकीटांचे रकमेचा दैनंदिन भरणा लेखाशाखेकडे करण्यात येतो.

लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडून मिळालेली पाकीटे विक्री झालेली पाकीटे व शिल्लक पाकीटे याचा दैनंदिन हिशेब लाडू निर्मिती विभागास कळविण्यात येतो. लाडू प्रसादाची विक्री करतांना साईभक्तांना कुपन देण्यात येत नाही. त्याऐवजी साईभक्तांकडून काऊंटरवरच पैसे घेवून लाडू प्रसाद पाकीटे विक्री करणेची पध्दत पुर्वी पासूनच अवलंबविण्यात येत आहे.

साईटेक प्रकल्पा अंतर्गत लाडू विक्री काऊंटरवर संगणक संच बसवून प्रथम साईभक्ताकडून कुपन विक्री काऊंटरवर पैसे घेतलेनंतर कुपन (तिकीट) देणेचे व त्यानंतर लाडू प्रसाद पाकीटे देणेचे प्रस्तावीत आहे.त्याकरीता साईटेक प्रकल्पा अंतर्गत लाडू विक्री काऊंटरवर संगणक संच बसविणेबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागास पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.त्याकरीता काही कालावधी लागणार आहे.परंतू लाडू विक्री काऊंटरवर प्रथम साईभक्तांना कुपन (तिकीट) देवून नंतर लाडू प्रसाद देणे

आवशक व गरजेचे असलेने सद्यस्थितीत छापील कुपन देवून कार्यवाही सुरु करणे आवशक आहे.तसेच साईटेक प्रकल्पा अंतर्गत साईभक्तांना संगणकीय कुपन देणेची कार्यवाही सुरु केलेनंतरही संगणकात तांत्रीक बिघाड झालेस छापील कुपन भक्तांना देता येतील त्यामुळे दैनंदिन कामात अडचण येणार नाही.लाडू विक्री काऊंटरवर दैनंदिन अंदाजे ३०,००० साईभक्त लाडू प्रसाद घेतात.साईभक्तांना प्रथम कुपन (तिकीट) देवून नंतर लाडू प्रसाद देणे आवशक आहे. त्यासाठी सध्या ५००० कुपन बुकाची छपाई करणेस हरकत नाही.

साईटेक प्रकल्पा अंतर्गत लाडू प्रसाद विक्री काऊंटरवर प्रथम संगणकीय पावती भक्तांना देवुन त्यानंतर लाडू प्रसाद पाकीटे देणेचे प्रस्तावीत आहे.तसेच ऐनवेळी संगणकात तांत्रीक बिघाड झालेस भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता भक्तांना छापील कुपन (तिकीट) देवून लाडू विक्रीची कार्यवाही सुरु ठेवता येईल.त्याकरीता कुपन छपाई करणे आवशक आहे. ५००० बुकास (१००० कुपनाचे एक बुक) छपाईसाठी अंदाजे रु ७०/- प्रति बुक याप्रमाणे एकुण रु.३,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सदरचा खर्च कॅन्टीन विभागाकडून खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या मुख्य कॅन्टीन खर्च बजेट मधून करता येईल.

तरी सोबतच्या जोडलेल्या नमुन्याप्रमाणे कुपन बुके विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत छपाई करुन घेणेकामी सदरचा प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद विक्रीसाठी आवश्यक असणारी कुपन बुके विहीत पध्दतीने छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.३१ श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयातील इ.५वी ते ७वी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थिनींना स्कुल बसच्या सुविधेबाबत.**

**प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग ४) समितीची कर्तव्ये व अधिकार १७(२-ढ)** मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक:-** संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी या विद्यालयात इ.५वी ते १०वी या वर्गांमध्ये ७५० विद्यार्थिनी शिकत आहे. यापैकी ३६२ विद्यार्थिनी इ.५वी ते ७वी या वर्गामध्ये शिकत आहे.या सर्वच विद्यार्थिनी सध्यस्थितीला पायी चालत, रिक्षा किंवा सायकलने विद्यालयात येतात, काही पालक स्वत: विद्यार्थिनींची ने-आण करतात, विद्यालय नगर मनमाड हायवे लगत असल्याने खुप मोठया प्रमाणात वाहतूक व वर्दळ असल्याने या रस्त्यावर सतत छोटे मोठे अपघात होत असतात. यामुळे इ.५वी ते ७वी या लहान वर्गातील विद्यार्थिनींना रस्त्याने पायी अथवा सायकलने जाणे-येणे दिवसेंदिवस त्रासदायक, धोक्याचे ठरत आहे.

संस्थानच्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी स्कूल बसने विद्यालयात येतात. मात्र कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींना स्कूल बसची सुविधा उपलब्ध नाही. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी स्कूलबस सुविधेकरीता आकारल्या जाणा-या शुल्का इतके शुल्क भरण्यास, कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींचे (एकूण संख्या:- १७७) पालक तयार आहेत, असे पालकांकडून सांगण्यात आले. कन्या विद्या मंदिरच्या विद्यार्थिनींना स्कुल बस सुविधा मिळणेकामी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थिनींची स्टॉप प्रमाणे संख्या १७७ एकूण फी रक्कम रूपये ३,५२,९६०/- (अक्षरी तीन लाख बावन्न हजार नऊशे साठ) एवढी मिळू शकते.

कन्या विद्या मंदिरच्या विद्यार्थिनींना स्कुल बस सुविधा देण्याकरिता वाहन विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आला त्यातील आशय खालीलप्रमाणे.

**वाहन विभाग अभिप्राय-** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयातील विद्यार्थिनींच्या पालकांच्या तोंडी विनंती वरून इ.५वी ते ७वी च्या वर्गातील विद्यार्थिनींना स्कुलबस सुविधा उपलब्ध करून द्यावयाचे झाल्यास

०१. सध्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे शैक्षणिक कामकाज सकाळी ०८ ते दुपारी १३ (इ.६वी ते १०वी) व दुपारी १२ ते १७ (इ.१ली ते ५वी) अशा दोन शिफ्टमध्ये चालत असुन इंग्लिश मिडीयम कडील विद्यार्थी ने-आण करणे कामी वाहन विभागाकडील ०९ बसेस वापरात आहेत इंग्लिश मिडीयमचे विद्यार्थी ने-आण केले नंतर दरम्यानचे कालावधीचा विचारकरता त्याच बसेसचा वापर कन्या शाळेच्या विद्यार्थिनींना ने-आण करणेसाठी करता येईल.

०२. तथापि, संध्याकाळी इंग्लिश मिडीयमचे विद्यार्थी घरी सोडविणेसाठी उशिर होवु नये म्हणुन कन्या शाळेची वेळ सकाळी १०.०० ते १६.०० ऐवजी ०९.३० ते १५.३० अशी करावी लागेल.

०३. कन्या विद्यालयाकडुन वाहन विभागास कळविण्यात आलेल्या विद्यार्थिनी संख्या व स्टॉप याचा विचारकरता खालील मार्गावर बसेस सुरू करता येतील.

अ) शिर्डी-पोलीस स्टेशन-हौसिंग सोसायटी-निमगांव-सावळीविहीर- लक्ष्मीनगर-शिर्डी.
परतीचे प्रवासासह अंदाजे कि.मी.-१३

ब) शिर्डी- दत्तनगर-शिंदेवस्ती-पिंपळवाडी-बन-कालीकानगर-शिर्डी.
परतीचे प्रवासासह अंदाजे कि.मी.-२६

क) शिर्डी-गणेशवाडी-करडोबानगर-कृष्णमंदिर-नांदुर्खी-शिर्डी.
परतीचे प्रवासासह अंदाजे कि.मी.-१४

ड) शिर्डी-काचमंदिर-श्रीरामनगर-कनकुरी-डोऱ्हाळे-शिर्डी.
परतीचे प्रवासासह अंदाजे कि.मी.-१७

इ) शिर्डी-साकुरीशिव-गोदावरी वसाहत-राहाता बसस्टँड-शिर्डी.
परतीचे प्रवासासह अंदाजे कि.मी.-१६

उपरोक्त प्रमाणे कन्या शाळेच्या विद्यार्थिनी ने-आण करणे करीता ०५ बसेसची
आवश्यकता भासेल या ०५ बसेसची परतीचे प्रवासासह अंदाजे ८६ कि.मी. अंतर होते.
(विद्यार्थिनी संख्या वाढलेस रूट मध्ये तसेच बसेसच्या संख्येत वाढ करावी लागेल.)

०४. भविष्यात इंग्लिश मिडीयमचे शैक्षणिक कामकाज ०१ शिफ्टमध्ये झाल्यास कन्या शाळेतील विद्यार्थिनी ने-आण करणे करीता नवीन बसेस खरेदी कराव्या लागतील.

उपरोक्त अभिप्राय लक्षात घेता सद्यस्थितीत कन्या विद्या मंदिरच्या शाळेच्या वेळात सकाळी १०.०० ते ४.०० ऐवजी सकाळी ९.३० ते ३.३० असा बदल केल्यास बस सुविधा देणे शक्य होईल असे मत आहे.

**मागणी:-** विद्यालयाच्या मागणीप्रमाणे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** विद्यार्थिनींना सुरक्षिततेच्या दृष्टीने बस सुविधा मिळावी.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत:-** उपरोक्त अधिनियम व इ.५वी ते इ.७वी विद्यार्थिनींच्या अडचणी लक्षात घेता, कन्या विद्या मंदिर विभागातील विद्यार्थिनींना स्कूल बस सुविधेचा लाभ मिळणेकरिता माननीय व्यवस्थापन समितीचा निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कन्या विद्या मंदिर मधील इ.५वी ते इ.७वी पर्यंतच्या विद्यार्थिनींना वाहन विभागाचे अभिप्रायानुरुप व इंग्लिश मिडीयम स्कुलकडील बससाठी असलेले शुल्क आकारुन, स्कुल बस सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शिक्षण घेणाऱ्या १०० % पायाने अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यास इ.१ली ते इ.१०वी पर्यंत शैक्षणिक शुल्क माफ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ मधील तरतूद:-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ (भाग -४) दि. ४ जानेवारी २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिद्ध केलेला अधिनियमा मधील २१(२ एक) नुसार राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था , क्रीडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल हे अत्यंत नावाजलेले स्कुल असून सन १९९० मध्ये स्थापना झालेली आहे. यावेळी एकुण विद्यार्थी ( मुले/मुली) १४४ इतकी संख्या होती. आजमितीस सन २०१४-१५ अखेर एकूण २२६० विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेने निकालाची परंपरा चांगली राखलेली आहे. आजपर्यंत इयता १० वी चे निकाल ९८ ते १०० टक्केच्या दरम्यान लागलेले असून विविध क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा संस्थान ही धर्मदायी संस्था असून गोरगरीबांना वैद्यकीय सेवा मोफत देणे तसेच इतर समाज कार्यात भरघोस मदत करणे, विविध उपक्रमांतर्गत योजनेसाठी अनुदान देणे यामध्ये संस्थानचा नेहमीच सिंहाचा वाटा असतो. आपल्या शाळेत गोरगरीब तसेच संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचारी पाल्य तसेच स्थानिक परिसरातील विद्यार्थी शिक्षण घेतात. इतर इंग्रजी माध्यामांचे शाळेच्या तुलनेत आपल्या शाळेचे शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क अत्यंत कमी आहे. संस्थानचे कायम कर्मचारी यांचे पाल्यांना संस्थानमार्फत शैक्षणिक शुल्क परतावा दिला जातो.

शैक्षणिक संकुलात श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शिक्षण घेणा-या परंतू वैद्यकीय दाखल्यानुसार १०० टक्के पायाने अपंग असणाऱ्या सर्व विद्यार्थी/ विद्यार्थीनीस इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे शैक्षणिक फी संस्थान मार्फत माफ करण्यात यावी असे नम्र मत आहे. आपल्या शाळेकडे अपंग विद्यार्थ्यांची संख्या अतिशय कमी आहे. तरी अशा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक फी माफी देणेची योजना राबविणेस हरकत नाही असे वाटते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** संस्थान अधिनियमात शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह बाबत तरतूद करण्यात आलेली असल्याने पायाने अपंग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक फी माफ करणे अशी योजना राबविणेस हरकत नाही असे वाटते. आशा एका अपंग विद्यार्थ्यांचा १ ली ते १० वी पर्यंतच्या शिक्षणाचा १० वर्षात साधारणत: ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) इतका खर्च होवू शकतो. सदरचे खर्चाची मान्यता मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठराव पास करुन करण्यात यावी. सदरचा आर्थिक बोजा संस्थान सहन करणार असल्याने फी माफी देणेस हरकत नाही.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** शासनाचे आर.टी. ई. २००९ चे कायद्यानुसार दुर्बल वंचीत घटकातील विद्यार्थ्यांना शासनाचे वतीने मोफत शिक्षण दिले जाते. त्याच अनुषंगानुसार संस्थान हे धर्मदाय ट्रस्ट असल्याने संस्थानचे वतीने आपल्या शाळेकडे शिक्षण घेणाऱ्या सर्व पायाने अपंग विद्यार्थी व विद्यार्थीना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शैक्षणिक सवलत देणेस हरकत नाही . आपल्या शाळेत अपंग विद्यार्थी संख्या अगदी अल्पप्रमाणत आहेत. अपंग विद्यार्थ्यांचे पालकांना असे वाटते की, संस्थानचे वतीने आपल्या पाल्याला शैक्षणिक फी सवलत मिळावी त्यासाठी ते वेळोवेळी विनंती अर्ज करत असतात. यापुर्वी अशाप्रकारची पायाने अपंग विद्यार्थ्यांना सवलत देण्यात आलेली नसल्याने एका विद्यार्थ्याला शैक्षणिक सवलत द्यावयाची झाल्यास शासनाकडे प्रस्ताव पाठवून मंजूरी घ्यावी लागते. या परवानगीसाठी बराच कालावधी जातो. तरी आपल्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या पायाने अपंग विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून शैक्षणिक फी माफी देणेबाबत परवानगी देण्यात यावी. जेणेकरुन समाज कार्यास हातभार लागेल व गरीब/ गरजू विद्यार्थ्यांना त्याचा फायदा मिळेल. तरी याबाबत चर्चा होवून अपंग विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे शालेय शुल्क माफ करणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दि.२१.११.२०१० रोजीच्या सभेमध्ये महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी, असा झालेला निर्णय क्र.८५०(०२) रद्द करणेत येऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शिक्षण घेणाऱ्या १००% पायाने अपंग असलेल्या विद्यार्थ्यांचे इ.१ली ते इ.१०वी पर्यंत शैक्षणिक शुल्क माफ करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३३** **शैक्षणिक संकुलाकडील सोयी-सुविधांबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी ग्रामस्थांनी दि.७ जुलै २०१४ रोजी शैक्षणिक संकुलाचे "मेन गेट" वर धरणे आंदोलन केले. आंदोलनानंतर मा.अप्पासाहेब शिंदे साहेब (उपकार्यकारी अधिकारी), यांना सोबतचे निवेदन दिले आहे. निवेदनात ग्रामस्थांनी नमूद केलेल्या मागण्या आणि त्यावरील स्पष्टीकरण (उपाययोजना) पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | ग्रामस्थांची मागणी | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | कन्या शाळेतील मुलींना त्वरीत बससेवा चालू करणे. | कन्याशाळेतील विद्यार्थीनीकरीता स्कूल बस सेवा सुरु करण्याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे. |
| २. | कन्या शाळेत इ.९ वी,१० वी चे वर्ग वाढविणे | सध्या इ.९ वी,१० वी च्या प्रत्येकी दोन वर्गतुकड्या सुरु असून त्यापैकी एकाच वर्ग तुकडीस शालेय शिक्षण विभागाची परवानगी आहे. नवीन ज्यादा तुकडी सुरू करण्यासाठी शिकविणेस वर्ग खोल्या उपलब्ध नाहीत. वर्गखोल्या उपलब्ध झाल्यावर नवीन |

| | | |
|---|---|---|
| | | तुकडी वाढीच्या मान्यतेसाठी शालेय शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करता येईल. |
| ३. | १) ज्युनिअर,कॉलेजचे इ.११ वी चे वर्ग वाढविणे. | ज्युनिअर कॉलेज मध्ये इ.११ वी कला व वाणिज्य शाखेची वर्ग तुकडी वाढविणे बाबतचा विषय मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात आला आहे.यासाठी शालेय शिक्षण विभागाची परवानगी घ्यावी असे ठरले आहे. सध्या इ.११ वी ची प्रवेश प्रक्रिया चालू आहे.उपलब्ध विद्यार्थी संख्येनुसार नवीन तुकडी वाढीच्या मान्यतेसाठी मा.शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल. इ.१२ वी च्या वर्ग तुकडयांची नैसर्गिकरीत्या वाढ होत असते त्यासाठी मा.शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल. |
| ४ | कन्या शाळेतील मुलींसाठी इ.११ वी, १२ वी चे स्वतंत्र वर्ग सुरु करणे. | |
| ५ | शिक्षकांची कमतरता भरून काढणे | शैक्षणिक संकुलाचे इंग्लिश मिडिअम स्कूल,कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ महाविद्यालय या विभागात शिक्षक भरती करण्यास मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिलेली आहे. त्यानुसार शिक्षक भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. |

वरील स्पष्टीकरणानुसार कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०७ जुलै, २०१४ रोजी शिर्डी ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनामधील प्रस्तावात नमुद केलेल्या एकूण ०५ मागण्यांपैकी मागणी क्र.०१ मंजूर करणेत येऊन क्र.०२, ०३ व ०५ च्या मागण्यांविषयीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत यावा, असे ठरले. तसेच अ.नं.४ ची मागणी नामंजूर करणेत आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर/ प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.३४ तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (एप्रिल-२०१४)**

**प्रस्ताव- व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदरस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णंसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल धुळे व नाशिक येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल/ सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.२२०७५/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- एप्रिल मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.२२०७५/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Require ment |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. R.R. Diagnostics, Dhule | 939 | 24/03/2014 | 9700.00 | RGJY |
| 2 | M/s. Aashirwad Agencies, Nashik | 30 | 25/04/2014 | 12375.00 | RGJY |
| | **Total Amt. in Rs.** | | | **22075.00** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदीच्या बीलाची रक्कम रु.२२,०७५/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देणेस आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५ तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (मे-२०१४)**

**प्रस्ताव- व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदरस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णंसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल शिर्डी,डोंबीवली व अहमदाबाद येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे / केमिकल / सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. ६३,५९९/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- मे मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.६३,५९९/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी:-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Requirement |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 949 | 09/05/2014 | 2627.00 | RGJY |
| 2 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 956 | 14/05/2014 | 1346.00 | RGJY |
| 3 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 958 | 14/05/2014 | 681.00 | RGJY |
| 4 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 959 | 15/05/2014 | 12205.00 | RGJY |
| 5 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 969 | 20/05/2014 | 5119.00 | RGJY |
| 6 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 970 | 21/05/2014 | 5091.00 | RGJY |
| 7 | M/s. Dynamicro Labs Pvt. Ltd., Dombivili | 106 | 16/04/2014 | 1030.00 | RGJY |
| 8 | M/s. Ortho Equip Inc. Ahmedabad | 76 | 26/04/2014 | 35500.00 | RGJY |
| | | **Total Amt. in Rs.** | | **63599.0** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात

नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदीच्या बीलाची रक्कम रु.६३,५९९/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देणेस आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६ सन २०१२-१३ मधील वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार होती. कारण सन २०१३-१४ या वर्षाकरिता लागाणाऱ्या वार्षीक औषधे खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात येऊन खरेदी प्रक्रिया चालू होती. आणि सदर कालावधीत औषधे / सर्जिकल साहित्याची आवश्यकता होती. त्यामुळे ती मागील मंजुर दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव आहे.

सदर साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार (सन २०१२-१३) वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ५२,०४१/- इतका खर्च येणार आहे.

**मागणी:-** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ५२,०४१/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देणेस आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७ श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.पी.डी. करीता ENT OPD Unit Set खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७-२ (ण)

**प्रस्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील ENT ओ.पी.डी या विभागाने दि.१०/०२/२०१४ रोजीचे मागणी पत्रकान्वये ENT OPD Unit Set ०१ नगाची मागणी केलेली आहे. कारण सध्या त्यांच्याकडे असलेले मशिन हे सन २००८ मध्ये खरेदी केलेले आहे. ENT ओ.पी.डी.रुग्णांची १ वर्षाची संख्या २८८००

इतकी आहे. त्याचा वापर मोठया प्रमाणात आहे. बाजारात सध्या असलेले मशिन Videoendoscope, Otomicroscope, Section Trolley, Warmer, Instruments Tray, Dr. Chair इत्यादी सुविधा असलेले उपलब्ध आहे. त्यामुळे अचुक निदान करणे सोईचे होईल. व पर्यायाने त्याचा रुग्णांना अधिक फायदा होईल. जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१५८५१/- इतकी आहे. जुने मशिन वॉर्डात तातडीचे सेवेसाठी वापरता येईल. त्यामुळे नविन मशिन खरेदी करणे गरजेचे आहे.

उपरोक्त ENT OPD Unit Set ०१ नग खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Optofine Instruments Pvt. Ltd., Miraj यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | ENT OPD Unit Set | 01 | 5,90,625.00 | 5,90,625.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **5,90,625.00** |

**मागणी:-** श्री साईनाथ रुग्णालयातील ENT ओ.पी.डी यांचे दि.१०/०२/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०४/२०१४) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** तरी वरीलप्रमाणे ENT OPD Unit Set ०१ नग विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ५,९०,६२५/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.६०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.पी.डी. करीता आवश्यक असलेला ०१ नग ENT OPD Unit Set विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५,९०,६२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८ श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. निरुपयोगी लिनन दर सहा महिन्यानंतर वॉर्डमधुन जमा करुन नष्ट केले जाते व गादया नष्ट करण्याकरीता मंजुरी घेऊन रेकॉर्ड विभागातुन नोंद कमी करुन ठरवुन दिलेल्या विक्रेत्याकडे विक्री करण्यात येते. सदरचे लिनन हे २००८ ते २०११ मध्ये जसे लागेल तसे खरेदी करण्यात आलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | खरेदी कलेले नग/ साल | दर प्रती नग | एकुण किंमत | कंडम करावयास आलेले लिनन | दर प्रती नग | एकुण रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाऊन | २०००-२०१० | १८४ | ३६८००० | -- | -- | -- |
| | प्लॅस्टिक गाऊन | ५००-२०१० | २२६ | ११३००० | १६२ | २२६ | ३६६१२ |
| २ | ड्रॉशीट | १८००-२० | ११८ | २१२४०० | २६४ | ११८ | ३११५२ |
| ३ | होलशीट | २५००-२०१० | १२८ | ३२०००० | १४६ | १२८ | १८६८८ |
| ४ | डॉ.ड्रेस | ७००-२०१० | २०८ | १४५६०० | ५९ | २०८ | १२२७२ |
| ५ | स्टाफ ड्रेस | ८००-२०१० | २०८ | १६६४०० | ८० | २०८ | १६६४० |
| ६ | करटेन | ७५०-२००६ | ६४ | ४८००० | ३ | ६४ | १९२ |
| ७ | सी आर्म कव्हर | ८-२००६ | २५० | २००० | ८ | २५० | २००० |
| ८ | टॉवेल | १९९-२०१२ | १२० | २३८८० | ९ | १२० | १०८० |
| ९ | कलर बेडशीट | ११००-२००८<br>११००-२०१०<br>१५००-२०१२ | २२०<br>१४१<br>२८५ | २४२०००<br>१५५१००<br>४२७५०० | ११५ | २८५ | ३२७७५ |
| १० | कलर पिलोकवर | ५००-२०१२ | ७८ | ३९००० | ११० | ७८ | ८५८० |
| ११ | पिलो प्रोटेक्टर | ५००-२०१० | ७१ | ३५५०० | ३९ | ७१ | २७६९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | चादर | ३७५-२०११<br>११००-२०१२ | ३७५<br>२७० | १४०६२५<br>२९७००० | ३२ | २७० | ८६४० |
| १३ | पेशंट ड्रेस | ७८०-२००८<br>५००-२०१०<br>५००-२०१२ | ३१८<br>२४६<br>२४६ | २४८०४०<br>१२३०००<br>१२३००० | २२५ | २४६ | ५५३५० |
| १४ | सफेद्र बेडशीट | १४८-२०१२ | १४३ | २११६४ | ६७ | १४३ | ९५८१ |
| १५ | पिडीयाट्रीक ड्रेस | २५-२०१२ | १४० | ३५०० | ५ | १४० | ७०० |
| १६ | पिलो | ४००-२००६<br>२००-२००७ | ४९०<br>२३८ | १९६०००<br>४७६०० | ४६ | २३८ | १०९४८ |
| १७ | नॅपकीन | ३००-२००८ | ४० | १२००० | २९ | ४० | ११६० |
| १८ | वॉर्डबॉय ड्रेस | १५०-२०१२ | २०८ | ३१२०० | ५१ | २०८ | १०६०८ |
| १९ | मॅट्रेस | २००५-२०११-६३८ | ४८३७ | ३०८६००६ | २५ | ४८३७ | १२०९२५ |
| २० | रघ | ५५०-२०१२ | ६७५ | ३७१२५० | २५ | ६७५ | १६८७५ |
| २१ | ट्रॉली कव्हर | १५-२०११ | २० | ३०० | ६ | २० | १२० |
| २२ | प्लॅस्टिक करटेन | ५२-२००९ | ५८० | ३०१६० | ३८ | ५८० | २२०४० |
| २३ | सफेद पिलोकवर | ३००-२०११ | ४८ | १४४०० | १८ | ४८ | ८६४ |
| २४ | मॅकीनटॉश | ३५०-२०११ | १२१ | ४२३५० | १० | १२१ | १२१० |
| २५ | स्ट्रेंचर मॅटेस | १२-२००५ | २५४० | ३०४८० | २ | २५४० | ५०८० |
| २६ | पेशंट गाऊन | ६५-२००८ | १६० | १०४०० | २३ | १६० | ३६८० |
| | | | | **७१२६८५५** | | | **४३०५४१** |

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१३ ते ३०/०९/२०१३ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक १३/१२/२०१३ निर्णय क्रमांक ९६१ अन्वये रु.२,२२,२७२/- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, त्यानंतर दिनांक ०१/१०/२०१३ ते ३१/०३/२०१४ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन जे निकामी लिनन जमा झालेले आहे, त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.४,३०,५४१/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्य परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत केलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९ Water (Prevention and Control of Pollution) Act, १९७४ अंतर्गत अधिकार पत्र मिळणेकामी ॲप्लीकेशन शुल्काबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे पर्यावरण व वनसंरक्षण खाते मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. २० जुलै १९९८ रोजी जैवीक वैद्यकिय निरुपयोगी व टाकाउ वस्तुंचे विल्हेवाटीकरीता काही नियम-अटी व कायदापालनासाठी जारी केलेल्या अधिसुचनेनुसार जैव वैद्यकिय कचरा (घनकचरा व सांडपाणी) निर्मीती, हाताळणी व व्यवस्थापन करणेत येत आहे. सदरकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळ यांचेकडुन अधिकारपत्र (Authorization Letter) सन २००६ ते २०१५ या कालावधीसाठी प्राप्त करणेत आले आहे.

तसेच म. प्र. नि. मंडळाने संदर्भीय पत्रान्वये Water (Prevention and Control of Pollution) Act, १९७४ अंतर्गत संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलसाठी (Consent) अधिकार पत्र प्राप्त करणेस कळविले आहे. त्यानुसार सबरिजनल ऑफीस म. प्र. नि. मंडळ अहमदनगर यांचेकडुन दोन स्वतंत्र ॲप्लीकेशन अर्ज घेतले असुन त्यामध्ये ॲप्लीकेशन शुल्क हे हॉस्पीटलचे कॅपिटल इन्व्हेस्टमेंट नुसार दर्शविले आहे.त्याप्रमाणे वित्त विभाग यांचेकडे मागणी केलेले स्वतंत्र कॅपिटल इन्व्हेस्टमेंटचे C.A. सर्टिफिकेट नुकतेच प्राप्त झाले असुन ते श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी रू४२०५७०८९३/- (अक्षरी रू.

बेचाळीस कोटी पाच लाख सत्तर हजार आठशे त्र्यान्नव व श्री साईनाथ हॉस्पीटलसाठी रु. २०९५६९७३९/- (अक्षरी रू. वीस कोटी पंच्यान्नव लाख एकोणसत्तर हजार सातशे एकोणचाळीस मात्र इतके आहे.

सदरचे C.A. सर्टिफिकेट नुसार ॲप्लीकेशन शुल्क खालीलप्रमाणे-

| म.प्र.नि.मंडळ तक्त्याप्रमाणे कॅपिटल इन्व्हेसमेंटनुसार | एक वर्षाचे शुल्क | श्री साईबाबा हॉस्पीटलचे कॅपिटल इन्व्हेस्टमेंट | पाच वर्षाचे शुल्क |
|---|---|---|---|
| २५ ोटी ते ५० ोटी साठी | ७५,०००. | ४२,०५,७०,८९३.०० | ३,७५,०००.०० |
| | | श्री साईनाथ रूग्णालयाचे कॅपिटल इन्व्हेस्टमेंट | |
| १० कोटी ते २५ ोटी साठी | ५०,०००.०० | २०,९५,६९,७३९.०० | २,५०,०००.०० |

अधिकार पत्र हे १ ते ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्राप्त करता येते त्यानुसार म. प्र. नि. मंडळ अहमदनगर यांचेकडे अर्ज करताना ५ वर्षाच्या कालावधीसाठी दोन्ही हॉस्पीटलकरीता एकुण रु.३,७५,०००+२,५०,००० = ६,२५,०००/- (अक्षरी रू. सहा लाख पंचवीस हजार मात्र) इतके शुल्क आवश्यक आहे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४० रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरतीबाबत जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रिक्त पदांवर भरती करणेकामी मा. त्रिसदस्यीय समिती व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार दि.२६.१०.२०१३ व दि.२६.११.२०१३ रोजी विविध वर्तमानपत्रे व संस्थान वेबसाईवर विविध पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीस अनुसरुन आलेल्या अर्जाची छाननी करुन पात्र अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या निवड समिती समोर दि.०१.०२.२०१४ रोजी घेण्यात आल्या होत्या.

मुलाखतीचा सिलबंद अहवाल व त्यासंबंधीत सर्व कागदपत्रे मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१२.०४.२०१४ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आली होती. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. २७१ पारीत झाला आहे की, दि.०१.०२.२०१४ झालेल्या मुलाखती रदद करण्यात याव्यात. रुग्णालयासाठी भरावयाच्या विविध पदांसाठी फेर जाहिरात देण्यात यावी व सदर जाहिरातीमध्ये वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देण्यात यावे. वयाची अट घालु नये अथवा किती वयोमर्यादा ठेवायची याबाबत विचार विनिमय करणेत येवुन निश्चित करणेत यावी व मा.औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे समिती गठीत करणेत येवुन मुलाखती घेण्यात याव्यात, असे ठरले. तसेच याकामी जाहिरातीसाठी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेकामी इकडील जा.नं. १४१/२०१४ दि. २५.०७.२०१४ नुसार जनसंपर्क कार्यालयास व माहिती तंत्रज्ञान विभागास कळविण्यात आले होते. सदरची जाहिरात संस्थान वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. परंतु जनसंपर्क कार्यालयाचे टिपणीनुसार १) दैनिक सकाळ– पुणे व नागपुर आवती. २) दैनिक इंडियन एक्सप्रेस- मुंबई, पुणे आवत्या ३) टाईम्स ऑफ इंडिया– मुंबई, अहमदाबाद व हैद्राबाद आवती ४) महाराष्ट्र टाईम्स– नागपुर, मुंबई, नाशिक आवती या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेस व त्याकामी रु.४,१९,७६०/- खर्च येईल

तरी याकामी येणा-या रु.४,१९,७६०/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामधील पी.आय.एल. नं.१८/ २०११, सिव्हील अर्ज क्र.९४१९/ २०१३ वरील दि.१३.०८.२०१३ रोजीच्या मा.खंडपीठाचे आदेशास अनुसरुन रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरतीबाबत प्रस्तावात नमुद केलेल्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,१९,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **पॅन्थॉरचे कातडे देणगी स्वरुपात स्विकारण्याचे कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री चंद्रभान लक्ष्मण गोपाळ कान्हेरे, सातारा यांनी त्यांचे वडीलांचे इच्छेनुसार संस्थानला पॅन्थॉरचे कातडे देणगी देण्याची इच्छा त्यांनी पत्राव्दारे कळविली आहे. सदरील पत्रामध्ये त्यांनी त्याची बाजारभावाने किंमत रुपये १५ ते २० लाख असल्याचे नमूद केले आहे. मात्र संस्थानने त्याची देणगी किंमत रुपये १० लाख लावावी, असेही त्यांचे पत्रात नमूद आहे. या संबंधीची सर्व सरकारी कागदपत्रे त्यांचे स्वत:चे मालकीची असून ते कागदपत्रे देणगीसोबत संस्थानला देणार असल्याचे म्हटले आहे.

सदर साईभक्ताच्या इच्छेनुसार पॅन्थॉरचे कातडे संस्थानमध्ये देणगी म्हणून स्विकारावे किंवा कसे? याबाबत निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.६०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी कार्यालयीन रजिस्टर/ पॅड छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भक्तनिवास विभागाच्या कामकाजाच्या अनुषंगाने मागील वर्षी आवश्यक असणारी कार्यालयीन रजिस्टर, पॅड परिसरातील प्रेस धारकाकडुन कोटेशन मागणी करून तातडीची बाब म्हणुन छपाई करणेत आलेली होती.

माहे जुन २०१४ अखेर या विभागाकडे खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे रजिस्टर/पॅड शिल्लक आहेत.

| अ. नं. | तपशिल | शिल्लक नग |
|---|---|---|
| १ | भरणा रजिस्टर | ०२ |
| २ | शिप्ट पर्यवेक्षक कॅश देवाण - घेवाण रजिस्टर | ०१ |
| ३ | कॅश देवाण - घेवाण रजिस्टर (लिपीक ) | २४ |
| ४ | टोकण फॉर्म भक्त नाव नोंदणी रजिस्टर | - |
| ५ | रूम नोंद रजिस्टर | ५९० |
| ६ | लगेज ट्रॉली पॅड | ०६ |

उपरोक्त स्टॉक हा दोन महिने पुरेल दरम्यान खालील तक्त्यात दर्शविलेले रजि./पॅड छपाई करून घ्यावे लागेल. त्यासाठी रू. ६४,२८०/- खर्च अपेक्षीत आहे.

| अ. नं. | छपाई तपशिल | पाने | कागदाचा प्रकार | साईज | नग | दर प्रति नग रु. | अंदाजे एकूण छपाई खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरणा रजिस्टर | १ ते १०० LVS | JK लेजर, ७०GSM | ११" x१६.५" with Numbring | ०५ | ६००/- | ३,०००/- |
| २ | शिप्ट पर्यवेक्षक कॅश देवाण - घेवाण रजिस्टर | १ ते १०० p p नंबर | JK लेजर, ७०GSM | ८.५" x १३" with Numbring | २० | ७०/- | १,४००/- |
| ३ | कॅश देवाण - घेवाण रजिस्टर (लिपीक ) | १ ते १०० LVS नंबर | JK लेजर, ७०GSM | ८.५" x १३" with Numbring | २० | ९०/- | १,८००/- |
| ४ | टोकण फॉर्म भक्त नाव नोंदणी रजिस्टर | १ ते १०० p p नंबर | JK लेजर, ७०GSM | ८.५" x १३" with Numbring | ७२ | १६५/- | ११,८८०/- |
| ५ | रूम नोंद रजिस्टर | १ ते १०० LVS नंबर | JK लेजर, ७०GSM | ८.५" x १३" with Numbring | ६०० | ७५/- | ४५,०००/- |
| ६ | लगेज ट्रॉली पॅड | - | JK लेजर,मॅप पेपर ७०GSM | ८.५" x १३" with Numbring | १२ | १००/- | १,२००/- |
| | | | | | **एकूण रू.** | | **६४,२८०/-** |

तसेच या प्रकरणाची कार्यवाही (शेडयुल) येणे प्रमाणे राहील.

| अ.नं. | कार्यवाही विभाग | तपशील | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. | १४/०७/१४ ते २१/०७/१४ | ०८ |
| २ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यते नंतर मा. व्य. मंडळा समोर सादर करावयाचा विषयांकीत प्रस्ताव मा. का. आ.साहेब यांचेकडे सादर करणे व तो प्रस्ताव मिटींग विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी देणे. | २२/०७/१४ ते २९/०७/१४ | ०८ |
| ३ | मिटींग विभाग | मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणे व पुढील कार्यवाही करणे कामी झालेल्या निर्णयाची प्रत या विभागाकडे येणे कामाचा कालावधी. | ३०/०७/१४ ते २८/०८/१४ | ३० |
| ४ | साईआश्रम भक्तनिवास | मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयाची प्रत व या संदर्भातील मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाही साठीसंबंधीत खरेदी विभागाकडे देणे | २९/०८/१४ ते ३०/०८/१४ | ०२ |
| ५ | खरेदी विभाग | मा. व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार दरपत्रके/ कोटेशन मागविणे. | ३१/०८/१४ ते ०७/०९/१४ | ०८ |
| ६ | खरेदी विभाग/ पार्टी | पार्टी कडुन दरपत्रके/ कोटेशन येण्याचा कालावधी. | ०८/०९/१४ ते १८/०९/१४ | १० |
| ७ | खरेदी विभाग | आलेले दरपत्रके / कोटेशन उघडणे कामी प्रस्ताव ठेवणे. | १९/०९/१४ ते २६/०९/१४ | ०८ |
| ८ | खरेदी विभाग | तुलनात्मक तक्ता करून प्रशासकीय मान्यता घेणे. | २७/०९/१४ ते ४/१०/१४ | ०८ |
| ९ | खरेदी विभाग | संबधीत पार्टीला कार्यादेश देणे. | ५/१०/१४ ते १२/१०/१४ | ०८ |
| १० | खरेदी विभाग/ पार्टी | माल पुरवठा करणे. | १३/१०/१४ ते २०/१०/१४ | ०८ |

तरी सदरचे रजिष्टर/पॅड छपाई कामी अंदाजे रक्कम रु. ६४,२८०/- (अक्षरी रूपयेः-चौसष्ट हजार दोनशे ऐंशी मात्र) चे खर्चास व मान्यते नंतर विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत छपाई करून घेण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले कार्यालयीन रजिस्टर/ पॅड छपाईकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६४,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी प्लॅस्टीक खुर्च्या खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेंवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

या अधिनियम व तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवासमधील खोल्या साईभक्तांचे निवासासाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेल्या असुन या ठिकाणी १२ इमारती मधुन १५३६ खोल्या आहेत.

त्यासाठी साईभक्तांना खोलीमध्ये बसण्यासाठी दोन प्लॅस्टिक खुर्च्या ठेवण्यात आलेल्या आहेत. १५३६ खोल्यांकरीता ३३०८ नग प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करण्यात आल्या होत्या. त्या प्रमाणे ३०७२ नग प्लॅस्टिक खुर्च्याचा रूमसाठी वापर होत आहे. तसेच या विभागाकडे १२ इमारती असुन प्रत्येक इमारतीत ४ मदतनिसांना बसणेसाठी प्रत्येक इमारतीत ४ खुर्च्या प्रमाणे ४८ नग खुर्च्या ठेवण्यात आलेल्या आहेत. कार्यालय व संरक्षण गेटसाठी १५ नग खुर्च्याचा वापर होऊन १७३ खुर्च्या स्टोअमध्ये शिल्लक होत्या. नव्याने विभाग सुरु झाल्यापासुन १३९ नग खुर्च्यांची फुटतुट झाल्यामुळे नुकसान भरपाई भक्तांकडुन घेण्यात आली. ती रक्कम वेळोवेळी संस्थान खाती जमा करण्यात आलेली आहे.

सबब १७३ नग खुर्च्यामधुन १३९ खुर्च्या वापरास काढण्यात आलेल्या आहेत. आता फक्त १४ नग प्लॅस्टिक खुर्च्या शिल्लक असुन त्याचा वापर पुढील एक ते दोन महिन्यात होईल. त्यामुळे पुढील खराब होणाऱ्या खुर्च्याच्या जागी नवीन प्लॅस्टिक खुर्च्याची आवश्यक्ता असल्याने ३०० नग प्लॅस्टिक

खुर्च्या खरेदी कराव्या लागतील.  यासाठी अंदाजे प्रती नगास रु. ३२५/- या प्रमाणे ३०० नग खुर्च्यासाठी रु. ९७,५००/- (अक्षरी रुपये :- सत्याण्णव हजार पाचशे मात्र) खर्च आपेक्षीत आहे.

तसेच या प्रकरणाची कार्यवाही (शेडयुल) येणे प्रमाणे राहील.

| अ.नं. | कार्यवाही विभाग | तपशील | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. | १४/०७/१४ ते २१/०७/१४ | ०८ |
| २ | साईआश्रम भक्तनिवास | प्रशासकीय मान्यते नंतर मा. व्य. मंडळा समोर सादर करावयाचा विषयांकीत प्रस्ताव मा. का. आ.साहेब यांचेकडे सादर करणे व तो प्रस्ताव मिटींग विभागाकडे पुढील  कार्यवाहीसाठी देणे. | २२/०७/१४ ते २९/०७/१४ | ०८ |
| ३ | मिटींग विभाग | मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणे व पुढील कार्यवाही करणे कामी झालेल्या निर्णयाची प्रत या विभागाकडे येणे कामाचा कालावधी. | ३०/०७/१४ ते २८/०८/१४ | ३० |
| ४ | साईआश्रम भक्तनिवास | मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयाची प्रत व या संदर्भातील मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाही साठीसंबंधीत खरेदी विभागाकडे देणे | २९/०८/१४ ते ३०/०८/१४ | ०२ |
| ५ | खरेदी विभाग | मा. व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार दरपत्रके/ कोटेशन मागविणे. | ३१/०८/१४ ते ०७/०९/१४ | ०८ |
| ६ | खरेदी विभाग/ पार्टी | पार्टी कडुन दरपत्रके/ कोटेशन येण्याचा कालावधी. | ०८/०९/१४ ते १८/०९/१४ | १० |
| ७ | खरेदी विभाग | आलेले दरपत्रके / कोटेशन उघडणे कामी प्रस्ताव ठेवणे. | १९/०९/१४ ते २६/०९/१४ | ०८ |
| ८ | खरेदी  विभाग | तुलनात्मक तक्ता करून प्रशासकीय मान्यता घेणे. | २७/०९/१४ ते ४/१०/१४ | ०८ |
| ९ | खरेदी विभाग | संबधीत पार्टीला कार्यादेश देणे. | ५/१०/१४ ते १२/१०/१४ | ०८ |
| १० | खरेदी विभाग/ पार्टी | माल पुरवठा करणे. | १३/१०/१४ ते २०/१०/१४ | ०८ |

तरी Cello कंपनीच्या CAPRI (बिस्किट कलर) प्लॅस्टिक खुर्च्या ३०० नग खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९७,५००/- चे खर्चास व विहीत पध्दतीने सदरच्या प्लॅस्टीक खुर्च्या खरेदी विभागामार्फत खदेरी करण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी ३०० नग Cello कंपनीच्या CAPRI (बिस्किट कलर) प्लॅस्टिक खुर्च्या विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **वाहन विभागामध्ये कंत्राटदारामार्फत कुशल वाहन चालक भरणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील दि.०९-०६-२०१४ रोजीची मंजूर टिपणी इकडील कार्यालयास प्राप्त झालेली असुन, त्यात त्यांनी "उपरोक्त विषयास अनुसरून दि.२९-०५-२०१४ रोजी साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, मॅनेजींग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, साईनगर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता ०५ बसेस देणगी दिलेल्या आहेत. सदर बसेसचा वापर साई आश्रम भक्तनिवासस्थान ते मंदिर परिसर व प्रसादालय येथे साईभक्तांना ने-आण करणेकामी चालु करावयाच्या आहे.  वरील देणगी  बसेसचा वापर सुरू करणेकामी वाहन चालकांची आवश्यकता भासणार आहे. वाहन विभागाचे हजेरीपटावरील वाहन चालकांतुन सदर बसेसकरीता वाहन चालक उपलब्ध करून देणे अडचणीचे होत आहे. सदर बसेसकरीता नविन १२ वाहन चालकांची आवश्यकता आहे. नविन देणगी बसेसकरीता कामगार विभागामार्फत नविन १२ हेवी वाहन चालविण्याचा परवाना असणारे कंत्राटी वाहन चालक (कुशल कामगार) मिळणेस मान्यता मिळावी."असे कळविलेले आहे.

उपरोक्त ०५ बसेस चा वापर साई आश्रम भक्तनिवासस्थान ते मंदिर परिसर व प्रसादालय येथे होणार असल्याने वाहन विभागास नव्याने १२ वाहन चालकांची आवश्यकता आहे. सध्या संस्थानचे दैनंदिन कामकाजाकरीता वाहन विभागाकडे कार्यालयीन-१०, रूग्णवाहीका-०८, बसेस-१८, मालवाहतुक-१८ अशी एकुण-५४ वाहन वापरात आहेत. कायम वाहन चालक- ३२ व कंत्राटी वाहन चालक-५६ असे एकुण-८८ वाहन चालक कार्यरत आहेत.

वाहन विभागाने १२ कुशल कंत्राटी वाहन चालकांची नविन ०५ बसेसकरीता साई आश्रम भक्तनिवासस्थान ते मंदिर परिसर व प्रसादालय येथे साईभक्तांना ने-आण करणेकामी मागणी केलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८०/२०११ दि.१६-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे या लेबर कॉन्ट्रॅक्टर यांना संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कामगार पुरविणेबाबत कॉन्ट्रॅक्ट देणेत आलेले आहे.

तरी वाहन विभागास १२ हेवी वाहन चालक परवाना असलेले (कुशल कामगार) मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे या लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत पुरविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे या लेबर कंत्राटदारामार्फत वाहन विभागासाठी आवश्यक हेवी वाहन चालक परवाना असलेले १२ कंत्राटी वाहनचालक (कुशल कामगार) कामावर घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख/ प्र.कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ मुख्य लेखाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे आर्थिक बाबींशी निगडीत कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र वित्त व लेखासेवा संवर्गातील वर्ग-१ चे पद शासनाने प्रतिनियुक्तीने नेमलेले आहे. सद्यस्थितीमध्ये मुख्य लेखाधिकारी यांचेकडे असलेल्या कामकाजाची पध्दती ठरवून दिलेली नाही. सद्यस्थितीमध्ये लेखाशाखा विभाग प्रमुख म्हणून मुख्यलेखाधिकारी हे कामकाज पाहत आहेत. सद्याची पध्दतीमध्ये सुसुत्रता नाही. मुख्यलेखाधिकारी हे पद महाराष्ट्र व लेखा संवर्गातील वर्ग-१ चे पद असून सदरील पदाचे कामकाज शासकीय विभागात पुर्व लेखापरिक्षण, अंतर्गत लेखापरिक्षण, वैधानिक लेखापरिक्षण, वित्तीय सल्लागार अशा स्वरूपाचे असते. त्याचा अहवाल नियंत्रण अधिकाऱ्याला/ मुख्य कार्यकारी अधिकारी/ आयुक्त/ उपायुक्त यांना सादर होत असतो. परंतू सद्यस्थितीत संस्थानमध्ये मुख्य लेखाधिकाऱ्याचे अहवाल व नस्त्या थेट कार्यकारी अधिकाऱ्याकडे /उप-कार्यकारी अधिकारी यांचेकडे न जाता प्रशासकीय अधिकाऱ्यामार्फत जातात. प्रशासकीय अधिकाऱ्याच्या नियंत्रणात असलेल्या विभागाचे पुर्वलेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल व नस्त्याचे लेखापरिक्षण पुन्हा प्रशासकीय अधिकाऱ्यामार्फत सादर होणे ही बाब प्रशासकीय दृष्टीने योग्य वाटत नाही. यास्तव खालील प्रमाणे कार्यपध्दती असावी.

देयकांचे व नस्त्यांचे लेखापरिक्षण आणि अंतर्गत लेखापरिक्षण निष्पक्षपणे व्हावे यासाठी मुख्य लेखाधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य वित्त व लेखाधिकारी यांचेप्रमाणे स्वतंत्र दर्जा देऊन त्यांच्या नियंत्रणात रुग्णालयाचा वित्त विभाग, लेखाशाखा व अंतर्गत लेखापरिक्षण देऊन सदरील पदनाम मुख्य लेखा व वित्त अधिकारी असे करण्यात येत आहे. सदरील पद कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणात काम करील व सर्व प्रशासकीय अधिकारी आपल्या विभागाच्या नस्त्या वित्तीय अभिप्रायासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर करतील तसेच संस्थानच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखाधिकारी प्रमाणे सर्व लेख्यावर नियंत्रण, वित्तीय व्यवस्थापन व गुंतवणुका, वित्तीय सल्लागार, अर्थसंकल्प, देयकांचे व नस्त्यांचे प्राथमिक लेखापरिक्षण, अंतर्गत लेखापरिक्षण, मध्यवर्ती भांडार तपासणी, निविदा पध्दती व स्विकृती नस्त्यावरील अभिप्राय तसेच व्यवस्थापन समितीच्या व बैठकीस उपस्थित राहून अध्यक्षांनी/ कार्यकारी अधिकारी यांनी विचारल्यास योग्य तो सल्ला देणे इत्यादी कामकाज पाहतील.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या नियंत्रणातील शाखा पुढीलप्रमाणे असतील.

०१) लेखाशाखा विभाग (त्यांचे प्रमुख सद्या लेखाशाखेकडे असलेले लेखाधिकारी हे असतील.)
०२) अंतर्गत लेखापरिक्षण विभाग (त्यांचे प्रमुख सद्या लेखाशाखेकडे असलेले दुसरे लेखाधिकारी हे असतील)
०३) रुग्णालयातील वित्त विभागः- (त्यांचे प्रमुख रुग्णालयाचे वित्त व्यवस्थापक हे असतील)

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली वरील तिनही शाखा राहातील तसेच रुग्णालयातील आर्थिक बाबींशी निगडीत सर्व नस्त्या वैद्यकीय संचालक यांच्या स्वाक्षरीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर होतील.

निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.६०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.६१०** यापुढे श्रींच्या सर्व आरत्यांसाठी ऑनलाईन १५० व्यक्ती व जनसंपर्क कार्यालयाकडून १५० व्यक्ती याप्रमाणे पासेसचे आरक्षण ठेवणेत यावे. तसेच ऑनलाईन आरती व दर्शन पासेसचे आरक्षण उपलब्धतेनुसार निर्धारित वेळेच्या दोन तास अगोदरपर्यंत चालू ठेवणेत यावे.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.५६५ ते ६१० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(कुंदनकुमार सोनवणे)
कार्यकारी अधिकारी
सदस्य

(शशिकांत कुलकर्णी)
प्रधान जिल्हा न्यायाधीश
अध्यक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी